# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक १९१ वा | बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संस्थाचालकाची गोळी झाडून आत्महत्या

**लातूर :** शिक्षणाची पंढरी आणि लातूर पॅटर्नसाठी राज्यभरात ओळखल्या जाणाऱ्या लातूर शहरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शहरातील सुप्रसिद्ध शिक्षण संस्थाचालक संजीव चंद्रभानू सोनवणे (वय ६२) यांनी राहत्या घरी स्वतःच्या डोक्यात गोळी झाडून जीवन संपवले आहे. मंगळवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर लातूरच्या शैक्षणिक आणि सामाजिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. खासगी शिकवण्यांच्या वाढत्या प्रस्थामुळे महाविद्यालयांना लागलेली उतरती कळा आणि त्यातून आलेले नैराश्य, हे या टोकाच्या पावलामागील मुख्य कारण असल्याचे त्यांच्या मित्रपरिवाराकडून सांगण्यात येत आहे. आत्महत्या करण्यापूर्वी संजीव सोनवणे यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती.

### आजचे हवामान

कमाल 32°C | किमान 21°C

पेट्रोल 111.21 | डिझेल 97.83

सोने 1,50,727 | चांदी 2,32,737

### संमिश्र

## अमेरिकेची शस्त्रे अंतराळात तैनात

**वॉशिंग्टन डीसी :** अमेरिकेने पहिल्यांदाच मान्य केले आहे की, त्यांनी अंतराळात शस्त्रे तैनात केली आहेत. अमेरिकेच्या हवाई दलाचे सचिव ट्रॉय मिंक यांनी सोमवारी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, अमेरिकेकडे कक्षेत अशी शस्त्रे आहेत, ज्यांचा वापर गरज पडल्यास अमेरिकन सैनिकांना शत्रूच्या हल्ल्यापासून वाचवण्यासाठी केला जाऊ शकतो. अमेरिकन अधिकाऱ्याने हे सांगितले नाही की, ही शस्त्रे नेमकी कोणत्या प्रकारची आहेत, किती आहेत आणि ती कधी अंतराळात पाठवली गेली होती. अमेरिकेचा हा खुलासा अशा वेळी झाला आहे, जेव्हा अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यात अंतराळात आपली ताकद वाढवण्याची स्पर्धा सुरू आहे.

## २००० पेक्षा जास्त पेमेंटवर शुल्क

**नवी दिल्ली :** यूपीआयद्वारे २,००० पेक्षा जास्त पेमेंटवर ०.४% शुल्क आकारले जाईल. प्रत्येक व्यवहारावर सुमारे ३०० रुपयांपर्यंत कमाल शुल्क भरावे लागेल. ही रक्कम वेगवेगळ्या व्यवहारांवर अवलंबून असेल. तथापि, ₹२,००० पर्यंत पेमेंट केल्यास ग्राहकाकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. अर्थ मंत्रालयाने सोमवारी अधिसूचना जारी करून ही स्थिती स्पष्ट केली होती. डेबिट कार्डद्वारे होणारे पेमेंट देखील या सवलतीत समाविष्ट केले आहे. हे शुल्क व्यक्ती ते व्यक्ती पेमेंटवर लागणार नसून कोणत्याही व्यक्तीने एखाद्या मर्चंटला किंवा एखाद्या मर्चंटने दुसऱ्या मर्चंटला केलेल्या पेमेंटवर लागू असणार आहे.

## संजय राऊतांचा सरकारवर घणाघात

**मुंबई :** दिशा सालियन प्रकरणातील एफआयआर, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतेच महाराष्ट्राबाबत केलेले विधान, या तिन्ही मुद्द्यांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली आहे. दिशा सालियन प्रकरणाचा तपास आणि बातम्या या पूर्णपणे मॅनेज असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. दिशा सालियान प्रकरणात संजय राऊत यांनी गंभीर आरोप केले. ते म्हणाले, ‘‘जोपर्यंत ठोस पुरावा नाही, तोपर्यंत कुणालाही आरोपी म्हणता येणार नाही.

कांद्याचे भाव सातव्या आस्मानावर




# ...अखेर हरेगावच्या भूमिपुत्रांना न्याय

## श्रीरामपूरातील हरेगावच्या शेतकऱ्यांना जमिनी परत मिळणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल (दि. १५) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील जमिनी मूळ मालक शेतकऱ्यांना परत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. यासाठी महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे हरेगाव परिसरातील संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जमीन प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या या निर्णयाकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले होते. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा ठरला आहे.

शेतकरी, सहकार, जमीनविषयक प्रश्न, प्रशासकीय सुधारणा, शहरी विकास, साहित्य-संस्कृती आणि पोलीस प्रशासनाशी संबंधित सात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यातील साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन उपलब्ध करून देण्याचा निर्णय ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष दिलासादायक मानला जात आहे. २०२५-२६च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपीची रक्कम देण्यासाठी आर्थिक अडचणीत असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

**राज्य सरकारचा मोठा निर्णय**

**ऊस उत्पादकांना दिलासा**

**साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन**

**महा-टॅकला मंजुरी**

राज्यातील अनेक साखर कारखान्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची एफआरपीची रक्कम वेळेत देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने कारखान्यांना आर्थिक आधार देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी २०२६-२७च्या गाळप हंगामाची तयारी सुरू असताना हा निर्णय साखर उद्योगासाठीही महत्त्वाचा ठरणार आहे. यापूर्वी झालेल्या आढाव्यातही थकीत एफआरपी आणि कारखान्यांच्या आर्थिक अडचणींचा मुद्दा चर्चेत आला होता.



### शेती, सहकार आणि प्रशासनाला प्राधान्य

मंत्रिमंडळाच्या या निर्णयांमध्ये एकीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या थकीत एफआरपीचा प्रश्न सोडविण्यासाठी साखर कारखान्यांना आर्थिक आधार देण्यात आला आहे, तर दुसरीकडे हरेगावच्या शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याच्या निर्णयातून दीर्घकाळ प्रलंबित जमीन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचबरोबर शासनाच्या योजनांचे मूल्यमापन, नगरविकास, साहित्य-संस्कृती आणि पोलीस प्रशासनाशी संबंधित निर्णय घेत राज्य सरकारने विविध क्षेत्रांना चालना देण्याचा प्रयत्न केला आहे.

राज्य शासनाच्या विविध योजना आणि धोरणांची परिणामकारकता तपासण्यासाठी महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष अर्थात महा-टॅक स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. राज्यातील २५ प्रमुख धोरणे आणि २५ प्रमुख लोककल्याणकारी योजनांचे सखोल विश्लेषण व मूल्यांकन या माध्यमातून केले जाणार आहे.

भारतीय व्यवस्थापन संस्था, मुंबई आणि योजना व धोरणविषयक संशोधन केंद्राच्या शिफारशींच्या आधारे हा मूल्यमापन प्रकल्प (पान ४ वर)

# मनोज जरांगे पाटलांचा मुंबईकडे एल्गार

## पोलिसांनी नाकारली परवानगी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी काल अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने कूच केले. मुंबई पोलिसांनी गणेशोत्सव आणि कायदा-सुव्यवस्थेचे कारण देत आझाद मैदानावरील आंदोलनाला सलग दोनदा परवानगी नाकारली आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांना मुंबईच्या वेशीवरच रोखले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उपोषणामुळे जरांगे पाटील यांची प्रकृती खालावलेली असतानाही ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. मुंबईकडे रवाना होण्यापूर्वी त्यांनी अंतरवाली सराटी येथील (पान ४ वर)

### मरणार पण शरण जाणार नाही

मुंबई आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आली असली तरी आपण माघार घेणार नसल्याचा निर्धार जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. मरणार पण शरण जाणार नाही, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेत सरकारवर टीका केली. मराठा समाजाच्या लेकरांच्या भविष्यासाठी आपला लढा सुरू असून, कोणत्याही दबावाला बळी पडणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पालकमंत्री विखे पाटलांचे आश्वासन पूर्ण

## हरेगाव येथील जमीनी शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा निर्णय



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील हरेगाव येथील जमीनी मूळ मालकांना परत देण्याचा ऐतिहसिक आणि महत्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आंदोलना दरम्यान दिलेल्या आश्वासानाची पूर्तता झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या जमीनी पुन्हा मिळाव्यात आशी मागणी शेतकऱ्यांची होती. यासाठी अनेक वर्ष संघर्ष झाला. राज्यात महायुती सरकार आल्यानंतर तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जमीनी पुन्हा त्यांना मिळाव्यात म्हणून राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. न्यायालयातही राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांची भूमिका निर्णायक पध्दतीने (पान ४ वर)

### शेतकऱ्यांच्या दीर्घ संघर्षाला अखेर यश

शेती महामंडळाच्या जमीनी मूळ मालकांच्या नावावर व्हाव्यात, यासाठी अनेक वर्ष कॉ. माधवराव गायकवाड आणि खासदार साहेबांच्या नेतृत्वाखाली मोठा संघर्ष झाला. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांच्या लढ्याला खरे यश मिळाले. शेवटच्या शेतकऱ्याला न्याय मिळेपर्यत कराव्या लागलेल्या प्रयत्नांमध्ये योगदान देता आल्याचे समाधान मंत्री विखे पाटील यांनी मंत्रीमंडळाच्या निर्णयावर व्यक्त केले.

# पक्ष-चिन्हाची निर्णायक लढाई

## सर्वोच्च सुनावणीत शिंदे गटाचा जोरदार युक्तिवाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्हावरील अधिकाराच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. शिवसेनेतील फुटीनंतर पक्ष नेमका कोणाचा आणि पक्षचिन्हावर अधिकार कोणाचा, या प्रश्नावर गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत एकनाथ शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी जोरदार युक्तिवाद केला. सुनावणी पूर्ण न झाल्याने प्रकरणाची पुढील सुनावणी आज, बुधवारी दुपारी होणार आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर (पान ४ वर)

### शिंदे गटाच्या युक्तिवादाकडे लक्ष

कौल यांचा युक्तिवाद पूर्ण न झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी आज, बुधवारी दुपारपर्यंत तहकूब केली. त्यामुळे आजच्या सुनावणीत शिंदे गटाकडून कोणते मुद्दे मांडले जातात आणि न्यायालय या संपूर्ण वादाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहते, याकडे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# ट्रॅक्टरखाली चिरडून चिमुकल्याचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** एकीकडे घरोघरी गणरायाच्या आगमनाचा आनंद आणि उत्साह सुरू असतानाच जवळा-मतेवाडी परिसरावर मात्र काळाने अत्यंत क्रूर घाला घातला. मतेवाडी येथे सोमवारी (दि. १४) घराच्या परिसरात घडलेल्या दुर्दैवी अपघातात ट्रॅक्टरच्या चाकाखाली सापडून देवांश सचिन मते या अवघ्या सव्वा वर्षाच्या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने मते कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवांशचे वडील सचिन सुग्रीव मते हे शेतातील मका कुट्टी करण्याचे काम आटोपून ट्रॅक्टर घेऊन घराच्या परिसरात आले होते. त्यावेळी देवांश घराच्या अंगणात खेळत होता. लहान असल्याने खेळता खेळता तो कधी ट्रॅक्टरच्या दिशेने गेला, याची कल्पना कोणालाही आली नाही.

सचिन मते हे ट्रॅक्टर हलवत असताना देवांश अचानक ट्रॅक्टरच्या मागील चाकाच्या परिसरात आला. ट्रॅक्टरच्या हालचालीदरम्यान तो चाकाखाली सापडला. या अपघातात चिमुकल्याला गंभीर दुखापत झाली. कुटुंबीयांनी तत्काळ त्याच्याकडे धाव घेतली; मात्र अपघाताची तीव्रता इतकी होती की देवांशचा जागीच मृत्यू झाला.

अवघ्या सव्वा वर्षांच्या देवांशच्या मृत्यूची बातमी कळताच मते कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. गणेश स्थापनेच्या दिवशी घरात आनंदाचे वातावरण असतानाच अचानक घडलेल्या या घटनेने परिसरातील (पान ४ वर)

# नागरिकांच्या अपेक्षांनुसार गावविकासाचा ध्यास

## आ. काशिनाथ दाते; पाडळी आळेत विविध विकासकामांचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** ग्रामीण भागातील विकासकामांना प्राधान्य देण्याची आपली भूमिका आहे. गावातील नागरिकांच्या मूलभूत गरजा, रस्ते, पाणी, सार्वजनिक सुविधा तसेच धार्मिक व सामाजिक स्थळांच्या विकासासाठी उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करून कामे मार्गी लावली जातील. गावाचा विकास हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा गटाचा विषय नसून संपूर्ण गावाच्या प्रगतीचा (पान ४ वर)



### आगामी काळात विकासकामांना गती

विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण झाल्याने पाडळी आळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक पातळीवरील मागण्या प्रत्यक्ष विकासकामांच्या माध्यमातून मार्गी लागत असल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या समन्वयातून आगामी काळातही विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास आ. काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला.

# घुलेंचा वारकरी-शेतकरी एकतेचा विचार प्रेरणादायी

## महंत उद्धव महाराज मंडलिक; लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त शेतकऱ्यांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भेंडा :** लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून वारकरी आणि शेतकरी यांना एकत्र आणण्याची परंपरा सुरू केली आणि ती आजही जपली जात आहे, असे प्रतिपादन नेवासा येथील श्रीसद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांनी केले.

भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे संस्थापक लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. १५) श्रीसंत नागेबाबा भक्त निवास येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखाना व उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा माजी आ. नरेंद्र घुले पाटील होते.



यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील, श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग यांच्यासह उद्योग समूहाचे पदाधिकारी, संचालक, शेतकरी, कामगार व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊली व लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ऊस शेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महंत उद्धव महाराज मंडलिक म्हणाले की, वैकुंठवासी बंशी महाराज तांबे यांच्या सूचनेनुसार घुले पाटील साहेबांनी साखर कारखान्याला संत ज्ञानेश्वर माऊलींचे नाव दिले. वारकरी संप्रदायातील संत-महंतांना विविध कार्यक्रमांसाठी आमंत्रित करून त्यांचा सहभाग घेण्याची परंपरा स्व. घुले पाटील यांनी सुरू केली. ही परंपरा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील आणि माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील यांनी आजही कायम ठेवली आहे. (पान ४ वर)

### श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्काराचे मानकरी

ऊस उत्पादनात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नेवासा व शेवगाव तालुक्यांतील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये चौधरी लताबाई भाऊसाहेब, दहातोंडे संजय पाराजी, भोईटे एकनाथ रामचंद्र, साळवे सुनीता भागचंद, डोईफोडे कडूबाई विजय, निकम अंबादास काशिनाथ, शिंदे सुनील जगन्नाथ, नरोडे रवींद्र शांतवन, रिंधे दिगंबर प्रल्हाद, कचरे संजय निवृत्ती, शिंदे अरुण बाबासाहेब, गोरे मिराबाई आसाराम, पुंड मुक्ताबाई सिताराम, क्षीरसागर शरद ज्ञानदेव, शित्रे गणपत मोहन, जमधडे वैभव पांडुरंग, गाढे काकासाहेब बाबासाहेब, गरड आदिनाथ मच्छिंद्र, नजन रुक्मिणी प्रभाकर, शिंदे भास्करराव रामभाऊ, वावरे मधुकर गेनुजी, बाहेती ओमप्रकाश रामनारायण, राजेभोसले चंद्रसेन मल्हारराव, गव्हाणे अमोल सुधाकर, गलांडे रामेश्वर मोहन, ढेसले गोवर्धन विष्णू, लोखंडे बाळासाहेब जनार्धन आणि जाधव माणिक भानुदास तसेच ऊस पुरवठ्यात उल्लेखनीय कामगिरी करणारे पवार संभाजी मोहनीराज (१ हजार मे.टन), बडधे राजेंद्र त्रिंबक (९६६ मे.टन), म्हस्के शकुंतला शिवाजी (७३७ मे.टन), आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे घुले अभिजीत नानासाहेब व काळे रवींद्र आबासाहेब तसेच सुधारित जातींचे ऊस बेणे पुरवठा करणारे चावरे विकास रोहिदास यांनाही गौरविण्यात आले.

# महामेळा अन् महावादनाने आज सजणार संगमनेर

## आ. तांबे यांच्या संकल्पनेतून पारंपारिक वाद्यांना प्रोत्साहन; ७५० वादक कलावंत




**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात संगमनेर शहर व तालुका हे सांस्कृतिक दृष्ट्या वैभवशाली ठरले आहे. पारंपारिक वाद्यांना प्रोत्साहन देऊन त्यांना व्यासपीठ मिळावे याकरता आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून आय लव संगमनेर चळवळ अंतर्गत आज, दि. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० ते १० या वेळेत संगमनेर बस स्थानक येथे भव्य महामेळा व महावादन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संयोजक डॉ. मैथिलीताई तांबे यांनी दिली आहे.

तांबे म्हणाल्या की, मागील वर्षापासून आ. तांबे यांच्या संकल्पनेतून संगमनेर शहरातील ढोल ताशा पथकाला राज्य व राष्ट्रीय पातळीवर वाव मिळावा या उद्देशाने या भव्य महावादन मेळाव्याचे आयोजन होत आहे. संगमनेरमधील अत्यंत प्रतिष्ठेचे संगमनेरी तांडव, हिंदू राजा प्रतिष्ठान, रुद्र प्रतिष्ठान, छावा प्रतिष्ठान व एकलव्य प्रतिष्ठान या ढोल ताशा पथकातील सुमारे ७५० युवक व युवती एकत्र येऊन हा महावादन मेळावा संपन्न करणार आहे.

महाराष्ट्रात ही अभिनव संकल्पना संगमनेर मध्ये प्रथम राबवली गेली आहे यामुळे संगमनेरचे अनेक कलावंत सोमनाथ गुजरात, तामिळनाडू, कलकत्ता, हिमाचल प्रदेश असे देशभरामध्ये विविध ठिकाणी कार्यक्रमासाठी जात आहेत. या सर्व कलाकारांना एकत्रित आणून हा भव्य महावादन मेळावा आज संपन्न होणार आहे.

> राज्यभरामध्ये डीजेच्या माध्यमातून कर्कश आवाजामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आवाज कमी करावा, अशी मागणी होत आहे. महाराष्ट्र हे सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत प्रगत असून आपल्याकडे विविध वाद्य आहेत. त्यापैकी ढोल ताशा पथकाला देशभरातून मागणी असून या पारंपरिक वाद्याला प्रोत्साहन देण्यासाठी हा महावादन व महामेळा संपन्न होत आहे. यामध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे.
>
> **– सत्यजित तांबे, आमदार**

गणेशोत्सवाच्या आनंद पर्व निमित्त बुधवार दिनांक १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते रात्री १० या वेळेत संगमनेर बस स्थानक येथे हा महामेळा व महावादन संपन्न होणार आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते मा. महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, दुर्गाताई तांबे, नूर मोहम्मद शेख, निखिल पापडेजा यांच्यासह संगमनेर शहर व तालुक्यातील विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या महावादन व महामेळासाठी संगमनेर शहरातील युवक युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आय लव संगमनेर चळवळ व सर्व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नेत्रशिबिर ठरले आशेचा किरण

## गणरायाच्या आगमनापूर्वी ६७ ज्येष्ठांच्या आयुष्यात नवदृष्टी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दृष्टीदोषामुळे अंधुक झालेल्या आयुष्यात पुन्हा प्रकाश निर्माण करण्याच्या उद्देशाने फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरातून ६७ ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळाली. पुणे येथील रुग्णालयात या ज्येष्ठ नागरिकांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या.

गणरायाच्या आगमनाच्या पूर्वसंध्येला नवदृष्टी घेऊन अहिल्यानगरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर गणपती बाप्पा मोरया चा जयघोष करत आनंद व्यक्त केला.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी शहरात परतलेल्या ज्येष्ठ नागरिकांचे स्वागत केले.

> गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे शहरातील गणेश मंडळांनी यंदाच्या उत्सवात नेत्रदान व अवयवदान या विषयांवर जनजागृतीपर देखावे सादर करावे. कोणताही अवयव कृत्रिमरीत्या तयार होत नसल्याने गरजू रुग्णांचे जीवन वाचविण्यासाठी एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या अवयवदानावर अवलंबून राहावे लागते.
>
> **– जालिंदर बोरुडे**

शस्त्रक्रियेनंतर स्पष्ट दिसू लागल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे जाणवत होता. गणेशोत्सवाच्या प्रारंभीच आयुष्यातील अंधुकपणा दूर होऊन दृष्टीचा अनमोल प्रकाश मिळाल्याने हा दिवस या ज्येष्ठांसाठी विशेष आणि अविस्मरणीय ठरला.

# चंद्रकोरीवर शुक्राची लखलखती बिंदी

## कर्जतकरांनी टिपले मनोहारी दृश्य; चंद्र-शुक्राची अनोखी भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जतच्या निरभ्र नभांगणात रविवारी संध्याकाळी निसर्गाने एक मनोहारी खगोलीय सोहळा साकारला. सूर्यास्तानंतर पश्चिम क्षितिजावर नाजूक चंद्रकोर आणि तिच्या जवळ अतीतेजस्वी शुक्र ग्रह एकत्र दिसल्याने कर्जतकरांचे लक्ष आकाशाकडे वेधले गेले. चंद्राच्या ललाटावर शुक्राची लखलखती बिंदी सजल्याचा भास देणारे हे विलोभनीय दृश्य अनेकांनी आपल्या मोबाईल आणि कॅमेऱ्यात टिपले.

संध्याकाळी अंधार दाटू लागल्यानंतर चंद्रकोर आणि शुक्राचे तेज अधिकच उठून दिसत होते. एका बाजूला शीतल, रुपेरी चंद्रकोर तर दुसऱ्या बाजूला हिऱ्यासारखा चमकणारा शुक्र असा हा नजारा कर्जतकरांसाठी विशेष आकर्षण ठरला. घराच्या गच्चीवर, गॅलरीत तसेच रस्त्यावरून अनेक नागरिकांनी काही काळ थांबून या अवकाशीय सौंदर्याचा आनंद घेतला. कर्जत परिसरातील एका छायाचित्रकाराने हा क्षण आपल्या कॅमेऱ्यात अचूक टिपला. निसर्ग, विज्ञान आणि छायाचित्रण यांचा सुंदर संगम असलेले हे छायाचित्र सोशल मीडियावरही चर्चेचा विषय ठरले. एरवी गजबजलेल्या कर्जतच्या संध्याकाळी आकाशातील या अवकाशीय रासलीलेने काही क्षणांसाठी वातावरणात एक वेगळेच शांत आणि मोहक सौंदर्य निर्माण केले.

### विज्ञान आणि सौंदर्याचा अनोखा संगम

खगोलशास्त्रीयदृष्ट्या चंद्र आणि शुक्र आकाशात एकमेकांच्या जवळ असल्याचे दिसणे ही खगोलीय युती अर्थात मून-व्हिनस कन्जंक्शन म्हणून ओळखली जाते. प्रत्यक्षात हे दोन्ही पृथ्वीपासून प्रचंड अंतरावर असूनही पृथ्वीवरून पाहताना ते आकाशात जवळ असल्याचा भास निर्माण करतात. नाजूक चंद्रकोरीच्या पार्श्वभूमीवर शुक्राचे विलक्षण तेज या दृश्याचे सौंदर्य अधिकच खुलवत होते.



# मतमाऊली यात्रेत भाविकांना अन्नदान

## ख्रिस्ती विकास परिषदेच्या सामाजिक उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : हरेगाव येथील प्रसिद्ध मतमाऊली यात्रेनिमित्त महाराष्ट्र अल्पसंख्याक ख्रिस्ती विकास परिषदेच्या वतीने राज्यभरातून आलेल्या हजारो भाविकांना चिवडा व फळांचे वाटप करण्यात आले. यावर्षी २५ हजारांहून अधिक भाविकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

मतमाऊली यात्रेत राज्याच्या विविध भागांतून भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात. आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात, यासाठी भाविक मारिया मातेच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होतात. या यात्रेचे औचित्य साधून महाराष्ट्र अल्पसंख्याक ख्रिस्ती विकास परिषदेच्या वतीने गेल्या २० वर्षांपासून जनजागृती अभियानासोबतच भाविकांसाठी अन्न व फळवाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.

परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि दीपक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही हा उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी राज्यभरातून आलेल्या विविध संस्था-संघटना, धर्मगुरू, धर्मभगिनी तसेच भाविकांनी परिषदेच्या जनजागृती अभियान आणि सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



या सामाजिक कार्यासाठी दीपक भाऊ कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश संसारे, अविनाश काळे, प्रवीणराजे शिंदे, दीपक साठे, डॉ. राजू साळवे, प्रमोद शिंदे, संदीप साळवे, विजय त्रिभुवन, निशिकांत पंडित, सुनील बोरगे, अशोक खंडागळे, रवींद्र लोंढे, अजित सुडगे, भाऊसाहेब तोरणे, विशाल पंडित, प्रकाश निकाले, अशोक साळवे, श्रीकांत मोरे, अल्पेश झुरुंगे, दिलीप सगळगिळे, प्रदीप छलानी, ॲड. आदेश दुशिंग, प्रशांत लोखंडे, बबलू लोंढे आदींनी अथक परिश्रम घेतले. उपक्रमासाठी विविध मान्यवरांनी केलेल्या सहकार्याबद्दल महाराष्ट्र अल्पसंख्याक ख्रिस्ती विकास परिषदेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

# ढोकेश्वर विद्यालयात जादूच्या प्रयोगांनी विद्यार्थी भारावले

## जादूगार शिरोळेंचा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश; १३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : जादू म्हणजे कौशल्य, हातचलाखी आणि विज्ञानाचा संगम असून, त्याचा अंधश्रद्धेशी संबंध नसतो. जादूगार आपल्या प्रयोगातून केवळ मनोरंजन करतो; मात्र याच प्रयोगांना दैवी शक्ती, चमत्कार किंवा उपचार म्हणून सादर करून लोकांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांपासून समाजाने सावध राहावे, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी केले.

नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत अरुण वाळुंज टॉक्स व्यासपीठाच्या माध्यमातून जादूच्या प्रयोगांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जादूगार प्रकाश शिरोळे यांनी विविध जादूचे प्रयोग सादर करत विद्यार्थ्यांना त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोनाची माहिती दिली.




इयत्ता पाचवी ते बारावीच्या सुमारे १३०० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. काही विद्यार्थ्यांनाही जादूच्या प्रयोगांमध्ये सहभागी करून घेण्यात आले. प्रयोगांदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील राजे छत्रपती हे गीत सादर करून वातावरण शिवमय केले. विद्यार्थ्यांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणा देत गीताला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कला समन्वयक राजेंद्र ढोणे, भांडार प्रमुख प्रा. देविदास आठरे, परीक्षा प्रमुख बाबासाहेब जाधव, चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले, तर आभार पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी मानले.

# श्रीरामपुरात पर्युषण पर्व उत्साहात

## चातुर्मासात जप-तपाची आराधना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : भगवान महावीर स्वामी यांच्या आशीर्वादाने तसेच प.पू. आचार्यश्री शिवमुनी म.सा., परमपूज्य युवाचार्य श्री महेंद्र ऋषिजी म.सा. आणि महाराष्ट्र प्रवर्तक परमपूज्य कुंदनऋषीजी म.सा. यांच्या आज्ञेनुसार श्रीरामपूर नगरीत चातुर्मासानिमित्त विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम उत्साहात सुरू आहेत. पर्युषण महापर्वामुळे शहरातील जैन समाजात भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

प.पू. अजितकुमारीजी म.सा. यांच्या सुशिष्या, तेला तप आराधिका, उपप्रवर्तिनी प.पू. चंदनबालाजी म.सा. तसेच बुलंदवाणी प.पू. पद्मावती म.सा. आदी ठाणा ७ यांच्या उपस्थितीत चातुर्मास सुरू असून, जप, तप, एकासन, आयंबील, तेला तप, खिरसमंदर तप, पुण्यकलश यांसह विविध तपश्चर्यांची आराधना केली जात आहे. विशेषतः ५१ उपवासाचे महातप सुरू असून, भाविकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. श्रीरामपूर शहरात श्रमणसंघाचा चातुर्मास तसेच समरथ गच्छ आणि ज्ञानगच्छ साधू-साध्वींच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत.

दररोज सकाळी ८.३० ते १० वाजेपर्यंत प्रवचनाचे आयोजन केले जाते. या प्रवचनाचा आणि विविध धार्मिक उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी बाहेरगावाहूनही मोठ्या संख्येने जैन बांधव श्रीरामपूर येथे दाखल होत आहेत. त्यांच्या निवासाची व्यवस्थाही योग्य पद्धतीने करण्यात आली आहे. दरम्यान, बेलापूर येथेही पर्युषण पर्वानिमित्त आठ दिवसांचे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. प.पू. चारुप्रज्ञाजी म.सा. व प.पू. सूर्यवंदनाजी म.सा. यांच्या उपस्थितीत प्रवचन, धार्मिक अनुष्ठाने व विविध कार्यक्रम उत्साहात सुरू आहेत. दि. ८ सप्टेंबरपासून सुरू झालेले पर्युषण महापर्व दि. १६ सप्टेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरे केले जात आहे. दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता पर्युषण पर्वाची सांगता होणार असून, त्यानंतर सामूहिक क्षमापना कार्यक्रम आणि पारणा होणार आहे.

# ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषाने कर्जत दुमदुमले

## ७६ गणेश मंडळांकडून प्रतिष्ठापना; एक गाव एक गणपती संकल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : लाडक्या बाप्पाचे आज कर्जत शहर आणि संपूर्ण तालुक्यात आबालवृद्धांनी अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात स्वागत केले. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषाने अवघा परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि आरत्यांच्या सुरांमध्ये लाडक्या गणरायाची सार्वजनिक मंडळांमध्ये तसेच घरोघरी प्रतिष्ठापना करण्यात आली. यावर्षी तालुक्यात ७६ सार्वजनिक गणेश मंडळांनी बाप्पाची स्थापना केली असून, पर्यावरणपूरक आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी ‘दोन एक गाव एक गणपती’ या संकल्पनेला गावागावांतून मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

यावर्षी पावसाने ओढ दिल्यामुळे संपूर्ण कर्जत तालुक्यावर दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. शेतकरी चिंतेत असून सर्वसामान्यांच्या मनातही धास्ती निर्माण झाली आहे. त्यामुळेच आज बाप्पाच्या स्वागताला उत्साहाची जोड असली, तरी प्रत्येकाच्या मनात पावसाची आस होती. गणपतीचे आगमन हे पाऊस घेऊन यावे आणि तालुक्यातील दुष्काळाचे सावट दूर व्हावे, अशी आर्त भावना आज प्रत्येक भाविकाने व्यक्त केली. सार्वजनिक मंडळांपासून ते घरोघरी स्थापन झालेल्या बाप्पाच्या चरणी हे विघ्नहर्त्या, तालुक्यावरील दुष्काळाचे संकट दूर कर आणि वरुणराजाला बरसू दे, असे साकडे भाविकांनी घातले.

यावर्षी बाजारपेठेत महागाईचा फटका गणेशोत्सवालाही बसल्याचे दिसून आले. कच्च्या मालाचे दर वाढल्यामुळे गणेश मूर्तींच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याबाबत माहिती देताना मूर्ती विक्रेत्यांनी सांगितले की, शाडूची माती, प्लास्टर ऑफ पॅरिस, रंग आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे यावर्षी मूर्ती महाग कराव्या लागल्या. केवळ मूर्तीच नव्हे, तर सजावटीचे साहित्य आणि पूजेच्या साहित्याचे दरही गगनाला भिडले आहेत. असे असूनही भाविकांच्या उत्साहात कोणतीही कमतरता जाणवली नाही.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कर्जत मुख्य बाजारपेठ आणि तालुक्यातील प्रमुख गावांमध्ये पूजेचे साहित्य, विविध प्रकारची फुले, तोरणे, आकर्षक विद्युत रोषणाई आणि मखरांचे शेकडो स्टॉल लागले होते. घरोघरी पारंपरिक तसेच आधुनिक पद्धतीने मखर आणि आरास करून बाप्पाच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती. सार्वजनिक मंडळांनीही सामाजिक संदेश देणारे देखावे आणि आकर्षक रोषणाईवर भर दिला आहे.

एकंदरीत, दुष्काळाची चिंता बाजूला सारत कर्जत तालुक्यातील नागरिकांनी लाडक्या बाप्पाचे स्वागत करून उत्सवाचा आनंद लुटायला सुरुवात केली आहे. बाप्पाच्या वास्तव्यात तालुक्यात चांगला पाऊस होईल, अशी आशा आता सर्वांना लागून राहिली आहे.

### सिद्धटेकमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

अष्टविनायक पैकी एक तीर्थक्षेत्र असणाऱ्या सिद्धटेक येथील सिद्धिविनायक मंदिरामध्ये देखील विविध कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले होते सध्या मंदिरामध्ये भाद्रपद यात्रोत्सव सुरू आहे. सकाळी सिद्धिविनायकाची महापूजा झाली त्यानंतर दुपारी बारा वाजता गणेश जन्म व गणेश प्रवचन हा कार्यक्रम संपन्न झाला. सायंकाळी श्रींचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. राज्यभरातून भाविक या ठिकाणी दर्शनासाठी आले होते.






# नगरमध्ये तायक्वांदो पंच परीक्षा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : इंडिया तायक्वांदोच्या मान्यतेने आणि महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनच्या अंतर्गत तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन, अहिल्यानगर व एकलव्य तायक्वांदो अकॅडमी, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंच परीक्षा उत्साहात पार पडली. झेंडा चौक, भूषण नगर, केडगाव येथील आर.एम.टी. बिझनेस सेंटरमध्ये परीक्षा घेण्यात आली.

या पंच परीक्षेसाठी परीक्षक म्हणून उत्तराखंडचे आंतरराष्ट्रीय पंच गौरव सिंह उपस्थित होते. त्यांनी सहभागी पंचांना तायक्वांदो खेळातील विविध तंत्रे, सामन्यांचे नियम, पंचांची भूमिका, निर्णयप्रक्रिया तसेच तंत्रशुद्ध पद्धतीने खेळाचे संचालन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या पंच परीक्षेत गणेश वंजारे, योगेश बिचितकर, युवराज लोखंडे, मंगेश आहेर, तेजअंकित बोंगाडे, वैष्णवी पाटोळे, ओमकार पवार, पियुष सहानी, अमित लोंढे, सचिन कोतकर, चंद्रकांत बिरारे, असता तोमर आणि सबा खान यांनी सहभाग नोंदविला.

# राक्षी येथे शेतकऱ्यांचा दोन तास रास्ता रोको

## ताजनापूरच्या पाण्यासाठी प्रशासनाचे लेखी आश्वासन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : राक्षी गावातील पाझर तलाव तसेच तलावालगतच्या नाल्यामध्ये ताजनापूर लिफ्ट टप्पा-२ अंतर्गत पाणी सोडण्यात यावे, या मागणीसाठी आज सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत राक्षी येथे शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. पाण्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे शेवगावगेवराई मार्गावरील वाहतूक काही काळ प्रभावित झाली.

राक्षी परिसरातील शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नाबाबत यापूर्वी संबंधित अधिकारी व प्रशासनाकडे निवेदने देऊन मागणी करण्यात आली होती.

> पाटबंधायाचे अधिकारी कुलकर्णी व जाधव यांच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेनंतर कुलकर्णी साहेबांनी राक्षीच्या पाझर तलावासाठी पुढील २३ दिवसांत ताजनापूर लिफ्टमधून पाणी सोडण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. या आश्वासनाची पूर्तता वेळेत झाली नाही, तर शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने पुढील लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात येईल.''
>
> **अतुल जुंबड**
> **(मा. उपसरपंच, ग्रामपंचायत राक्षी)**

मात्र, प्रत्यक्ष पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांनी आज रास्ता रोको आंदोलनाची भूमिका घेतली. आंदोलनादरम्यान प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच तहसीलदारांच्या उपस्थितीत शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा केली. चर्चेनंतर प्रशासनाच्या वतीने शेतकरी प्रतिनिधींना लेखी आश्वासन देण्यात आले. या लेखी आश्वासनानुसार, पुढील दोन ते तीन दिवसांच्या आत ताजनापूर लिफ्ट टप्पा-२ अंतर्गत राक्षी गावातील पाझर तलावालगतच्या नाल्यामध्ये पाणी सोडण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पाणी राक्षीच्या पाझर तलावापर्यंत सुरळीतपणे पोहोचण्यासाठी संबंधित पाईपलाईन व पाणी वितरण व्यवस्थेची पाहणी करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

पाणी पाझर तलावापर्यंत पोहोचेपर्यंत संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष पाहणी व देखरेख करतील, तसेच कार्यवाहीची प्रगती शेतकरी प्रतिनिधींना कळविण्यात येईल, असेही लेखी आश्वासनात नमूद करण्यात आले आहे. पाणीपुरवठ्याच्या मार्गात कोणत्याही व्यक्ती अथवा समूहाकडून अडथळा निर्माण झाल्यास संबंधित प्रशासकीय व पोलीस यंत्रणेच्या समन्वयातून आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर शेतकरी प्रतिनिधींनी आजचे रास्ता रोको आंदोलन स्थगित केले. मात्र, दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष पाणी राक्षीच्या पाझर तलावालगतच्या नाल्यामध्ये सोडण्यात आले नाही, तर शेतकरी पुन्हा लोकशाही व कायदेशीर मार्गाने आंदोलन करतील, अशी भूमिका यावेळी स्पष्ट करण्यात आली.

# समर्थ संकुलात क्रिकेट स्पर्धा उत्साहात

## ४० शाळांतील मुला-मुलींच्या संघांचा सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**




**बेल्हे** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे, जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना तसेच समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बांगरवाडी-बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जुन्नर तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धा २०२६-२७ समर्थ क्रीडा संकुल, बेल्हे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

> स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, सचिव विवेक शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, समर्थ गुरुकुल चे प्राचार्य सतीश कुऱ्हे आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर यांच्या वतीने आभार मानले तसेच सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धे स शुभेच्छा देण्यात आल्या.

या स्पर्धेत जुन्नर तालुक्यातील सुमारे ४० शाळांमधील १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण तसेच सांघिक खेळाचे प्रदर्शन करीत क्रीडाक्षेत्रातील गुणवत्ता सिद्ध केली. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके आणि संपत स्पोर्टचे संपत शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही सातत्याने प्रगती करावी, असे आवाहन केले. विजेत्या संघांना संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके, जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष गणेश राऊत यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी समर्थ शैक्षणिक संकुलाचे क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक वऱ्हाडी आणि आश्विनी जगदाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# पावसाअभावी बाजारात शुकशुकाट

## व्यापारी, किरकोळ विक्रेते झाले हवालिदल

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राशीन** : पावसाने पाठ फिरवल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील बळीराजा कमालीचा उदासीन झाला असून, या दुष्काळी परिस्थितीचा थेट फटका आता ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या आठवडे बाजारंना बसू लागला आहे. राशिनचा दर मंगळवारी आठवडा बाजार भरतो, परंतु नेहमीची गर्दी गायब झाल्याने मुख्य बाजारपेठेत अक्षरशः शुकशुकाटाचे चित्र आहे.

ग्राहकांनी खरेदीकडे पाठ फिरवल्याने व्यापाऱ्यांची दैनंदिन उलाढाल मोठ्या प्रमाणात मंदावली असून किरकोळ विक्रेतेही हवालदिल झाले आहेत. पावसाअभावी शेतातील खरिपाची उभी पिके डोळ्यांदेखत करपू लागली आहेत. पिके वाचतील की नाही, या चिंतेत शेतकरी वर्ग आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. राशीनच्या मंगळवार बाजारात दर आठवड्याला भाजीपाला, मिठाई, किराणा व कपड्यांची दुकाने मोठ्या संख्येने थाटली जातात. मात्र, विक्रेते माल सजवून बसले असले तरी खरेदीदार गायब अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहार पूर्णतः शेतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याचा परिणाम थेट बाजारावर दिसून येत आहे. त्यातच वाढती महागाई, भाजीपाल्याला न मिळणारा भाव आणि पावसाचा लपंडाव यामुळे शेतकरी तिहेरी कोंडीत सापडला आहे.

शेतात आवक असूनही मालाला उठाव नसल्याने व्यापारी वर्गही पुरता अडचणीत सापडला आहे.आता लवकरात लवकर दमदार पाऊस पडला तरच उभ्या पिकांना जीवनदान मिळेल आणि बाजारातील आर्थिक चक्र पुन्हा सुरू होईल, अशी आशा राशीन परिसरातील शेतकरी व व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# कॅन्सरग्रस्तांना शिर्डीतच मोफत उपचार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : श्री साईबाबा संस्थानाच्या साईनाथ रुग्णालयात कॅन्सरग्रस्त रुग्णांना स्थानिक पातळीवरच उपचार मिळावेत, या उद्देशाने ३१ खाटांचे अद्ययावत कॅन्सर डे-केअर (किमोथेरपी) सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तदर्थ समितीने जूनमध्ये झालेल्या बैठकीत या प्रकल्पासाठी साडेसहा कोटी खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. उच्च न्यायालयानेही यासाठी नुकतीच अनुमती दिल्याने येत्या दोन महिन्यांत हे युनिट सुरू होईल. अशी माहिती सीईओ गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

साईनाथ रुग्णालयात दररोज सुमारे हजार अकराशे रुग्ण ओपीडीसाठी येतात. दर शनिवारी ऑन्कोलॉजिस्ट डॉ. मुकुल घारोटे रुग्णांची तपासणी करतात. मात्र, किमोथेरपी किंवा रेडिओथेरपीची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना पुढील उपचारासाठी मुंबई, पुणे किंवा इतर मोठ्या शहरांतील रुग्णालयांत रेफर करावे लागत होते. रुग्णांची वाढती संख्या आणि मागणी विचारात घेऊन संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा प्रधान न्यायाधीश एस. बी. कचरे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व सीईओ गोरक्ष गाडीलकर यांनी हा निर्णय घेतला आहे. कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेता सर्व जिल्हा रुग्णालयांत डे केअर सेंटर स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे. या धोरणांतर्गत शिर्डी संस्थानास एल-३ स्तराचे कॅन्सर सेंटर मंजूर झाले असून, यासाठी लागणारा बांधकाम, यंत्रसामुग्री व मनुष्यबळाचा खर्च संस्थानामार्फत केला जाणार आहे, अशी माहिती वैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे व वैद्यकीय अधीक्षक डॉ. मैथिली पितांबरे यांनी दिली.

> **अशी असेल अद्ययावत यंत्रसामुग्री**
>
> ३१ खाटांच्या या सेंटरमध्ये २ व्हेंटिलेटर, १६ इलेक्ट्रिक फाउलर बेड, १५ इलेक्ट्रिक किमोथेरपी चेअर्स, बायोसेफ्टी कॅबिनेट, सिरिंज पंप व मॉनिटर्स अशी अद्ययावत यंत्रसामुग्री उपलब्ध असेल. याशिवाय मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, ४ आरएमओ, २४ ऑन्कोलॉजी नर्सेस, फार्मासिस्ट, कौन्सिलर व इतर कर्मचारी असे एकूण ४७ जणांचे मनुष्यबळ टप्पाटप्प्याने तैनात केले जाईल.

# मढी-येवलवाडी दिंडीने जपली परंपरा

**जनता आवाज वृत्तसेवा**




**पाथर्डी** : श्रीक्षेत्र मढी येथून श्रीक्षेत्र येवलवाडीकडे (ता. शिरूर कासार, जि. बीड) निघालेल्या श्री कानिफनाथ महाराजांच्या पायी दिंडीचे पाथर्डी शहरात माजी नगरसेवक रमेश गोरे मित्र मंडळ व नाथभक्तांच्या वतीने उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. फटाक्यांच्या आतषबाजीत आणि 'गोरक्ष जालंदर चर्पटाश्च'च्या जयघोषात दिंडीचे स्वागत झाल्याने परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.गुरु-शिष्य भेटीची परंपरा असलेल्या या पायी पालखी सोहळ्याचे यंदाचे २६ वे वर्ष आहे. भाद्रपद शुद्ध ऋषी पंचमीला श्री जालिंदरनाथांच्या यात्रेनिमित्त गुरु-शिष्य भेटीसाठी मढी येथून ही दिंडी येवलवाडीकडे मार्गस्थ होते. पालखी सोहळा समिती, मढी कानिफनाथ व्यापारी मंडळ आणि मढी ग्रामस्थांच्या वतीने बाबासाहेब कोंडीराम मरकड यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.मढी येथून नवनाथ सिद्धांच्या जयघोषात पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. पाथर्डीत दिंडीचे आगमन झाल्यानंतर नाथभक्तांनी पालखीतील श्री कानिफनाथ महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून आरती केली. त्यानंतर भक्तिमय गीतांच्या तालावर नाथभक्तांनी ठेका धरत आनंद व्यक्त केला. फटाक्यांच्या आतषबाजीने आणि जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.यावेळी बाबासाहेब महाराज मरकड, भिसे महाराज, माजी नगरसेवक रमेश गोरे, बबन ढवळे, गणेश सोनटक्के, गजानन भंडारी, रमेश मरकड, दिगंबर मरकड, बाळासाहेब चितळे, महेश मरकड, भाऊसाहेब मरकड, बबन मरकड, छगन पोळ, शहादेव बोरुडे यांच्यासह नाथभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलांवरील ओझे हलके होणार, वर्षातील दहा दिवस दप्तरमुक्त

## बॅग पॉलिसी-२०२०ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर** : राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये स्कूल बॅग पॉलिसी-२०२०ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. वाढत्या दप्तराच्या वजनामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर होणारा गंभीर परिणाम लक्षात घेऊन शासनाने हा निर्णय घेतला आहे. या धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे वजन त्यांच्या एकूण शारीरिक वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे, तसेच सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षातून १० दिवस दप्तरविरहित कालावधी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शाळांमध्ये दररोज लागणाऱ्या वह्या-पुस्तकांचा खच, पाण्याच्या बाटल्या व डब्यामुळे विद्यार्थ्यांच्या दप्तराचे वजन प्रचंड वाढले आहे. त्यामुळे लहान वयातच विद्यार्थ्यांना पाठदुखी, मानदुखी, पाठीच्या कण्यांचे आजार आणि थकवा अशा शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते. डॉक्टरांच्या मते, वजनाच्या अयोग्य संतुलनामुळे मुलांच्या शारीरिक वाढीवरही विपरीत परिणाम होतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी व शाळा व्यवस्थापनांना धोरणाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. शाळांमध्ये या नियमांचे पालन होते की नाही, याची पाहणी करण्यासाठी अचानक तपासण्या केल्या जाण्याची शक्यता आहे.

> **१० दिवसांचा दप्तरविरहित उपक्रम**
>
> सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षातून १० दिवस दप्तरमुक्त ठेवण्याची सूचना देण्यात आली आहे. या दिवसांत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण, कला, क्रीडा, हस्तकला, स्थानिक कारागिरांची भेट, निसर्ग भ्रमंती व प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण दिले जाईल. त्यामुळे मुलांमधील कौशल्यांचा विकास होईल व त्यांना पुस्तकी ज्ञानाबाहेरचे व्यावहारिक शिक्षण मिळेल.

अनेकदा वेळापत्रकाचे योग्य नियोजन नसल्याने मुले नको असलेली पुस्तकेही दप्तरात आणतात. त्यात रोजच्या विषयांची पाठ्यपुस्तके व जाडजूड वह्या, चित्रकला, निबंध व गृहपाठाच्या अतिरिक्त वह्या, कंपास पेटी, रंगपेटी, इतर शैक्षणिक साहित्य, पाण्याच्या मोठ्या बाटल्या व खाऊचा डबा यामुळे दफ्तराचे वजन वाढते. शाळांनी टाइमटेबल सुटसुटीत ठेवावे आणि पिण्याच्या पाण्याची सोय शाळेतच उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून बॅगचे वजन कमी होईल.

नव्या नियमानुसार विद्यार्थ्यांच्या वयोगट आणि वजनानुसार दप्तराची मर्यादा ठरवून देण्यात आली आहे. त्यानुसार, दप्तराचे वजन विद्यार्थ्याच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. पहिली-दुसरीसाठी १.६ ते २.२ किलो, तिसरी ते पाचवीसाठी १.७ ते २.५ किलो, सहावी ते आठवीसाठी २.५ ते ३.५ किलो.

# आयसीटीसी केंद्राला विद्यार्थ्यांची अभ्यासभेट




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : एडस्विषयी जनजागृती केवळ व्याख्यानांपुरती मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांना प्रतिबंध, तपासणी आणि समुपदेशनाची प्रक्रिया प्रत्यक्ष समजावी, या उद्देशाने एनएसएस स्वयंसेवकांनी पारनेर ग्रामीण रुग्णालयातील एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्राला (आयसीटीसी) अभ्यासभेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी आरोग्य यंत्रणेचे कामकाज, तपासणी प्रक्रिया आणि रुग्णांच्या समुपदेशनाची पद्धत जवळून समजून घेतली. आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात आरोग्यविषयक जागरूकतेसाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी एडस् आयसीटीसी समन्वयक विकास वाळुंज यांनी एडसची कारणे, संसर्गाचे मार्ग आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पारनेर ग्रामीण रुग्णालयातील आयसीटीसी केंद्राला भेट देऊन एडस्ची तपासणी, समुपदेशनाची प्रक्रिया आणि रुग्णांची गोपनीयता याबाबत माहिती घेतली. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियंका शिरसाट आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. एडस् आयसीटीसी समन्वयक विकास वाळुंज आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ परिचर रूपाली देशमुख यांनी विद्यार्थ्यांना केंद्राचे कार्य, आवश्यक वैद्यकीय तपासण्या, रक्त नमुना तपासणी आणि समुपदेशन याबाबत सविस्तर माहिती दिली. एडस् बाधित व्यक्तींशी भेदभाव न करता त्यांना आधार व वैज्ञानिक माहिती देण्याची गरजही स्पष्ट करण्यात आली.

# सीना नदी पात्र पडले कोरडेठाक



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील जेऊर बा. येथील ससेवाडी महादेव मंदिर परिसरातून उगम पावणारी सीना नदी जामगाव, सावेडीमार्गे अहिल्यानगर शहरातून पुढे दक्षिण दिशेने वाहते. त्यानंतर आग्नेय दिशेने प्रवास करत बुरूडगाव, वाकोडी, पारगाव, वाळुंज आदी परिसरातून पुढे जाते. शिराढोण, दहिगाव, साकत खुर्द, वाटेफळ, रुईछत्तीसी या भागांनंतरचे नदीपात्र सध्या मात्र पाण्याअभावी कोरडे ठणठणीत पडले आहे. त्यामुळे चारा, पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दरवर्षी पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारी सीना नदी यंदा पावसाच्या प्रदीर्घ ओढीमुळे पूर्णपणे कोरडीठाक पडली आहे. ससेवाडीतून उगम पावून पुढे शिराढोण, दहिगाव, साकत खुर्द, वाटेफळ आणि रुईछत्तीसी या भागांतून वाहणाऱ्या नदीपात्रात सध्या पाण्याचा थेंबही उरलेला नाही. परिणामी, परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत झपाट्याने घट झाली असून, शेतात उभी असलेली मका, ऊस आणि कडवळ यांसारखी पिके पाण्याअभावी डोळ्यांदेखत कोमेजू लागली आहेत. पिके वाळल्याने जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा बिकट यक्षप्रश्न निर्माण झाला आहे. शेतीचे उत्पादन हातचे जाण्याच्या भीतीसोबतच मुक्या जनावरांना कसे जगवायचे, या चिंतेने नदीकाठचा शेतकरी पूर्णपणे खचून गेला आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट उभे ठाकण्याची चिन्हे असून प्रशासनाने केवळ कागदोपत्री अहवालांवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शिवारात जाऊन पाहणी करावी. पाणी, चारा आणि पीकनुकसानीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन तातडीने मदत व उपाययोजना करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. करपलेली व रोगग्रस्त पिके नोंदवण्यासाठी उपलब्ध यंत्रणा पुरेशी सक्षम नाही, त्यामुळे मोठी गैरसोय होते. त्यासाठी पीक पाहणी ॲपमध्ये तातडीने स्वतंत्र पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# तरुण अभियंत्यांना रोजगाराची संधी देणार

## नगराध्यक्ष आव्हाड; अभियंता दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी नगरपरिषदेत अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अभियंता क्षेत्रात कार्यरत असलेल्या अभियंत्यांसह रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या तरुण अभियंत्यांचाही नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे, मनीषा उदमले, संतोष उदमले आदी उपस्थित होते. अनेक वर्षांनंतर अभियंता दिन पाथर्डी नगरपरिषदेकडून सादर केल्याने अभियंतांमध्ये वेगळी भावना निर्माण झाली. नगराध्यक्ष आव्हाड म्हणाले, अभियांत्रिकी हे केवळ नोकरी मिळविण्याचे क्षेत्र नसून शहराच्या विकासाला दिशा देणारे महत्त्वाचे क्षेत्र आहे. पाथर्डी शहराच्या विकासामध्ये स्थानिक अभियंत्यांच्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा अधिकाधिक उपयोग करून घेण्याचा आमचा प्रयत्न राहील. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली पाथर्डीतील नव्या पिढीतील अभियंत्यांना व्यवसाय व उद्योगाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. पाथर्डी शहर व तालुक्यात विविध विकासकामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून या कामांमध्ये स्थानिक तरुण अभियंत्यांना सहभागी करून घेता येईल. शासनाच्या विविध योजना, बांधकाम क्षेत्र, पायाभूत सुविधा तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून अभियंत्यांसाठी नव्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येईल. रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या अभियंत्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतःच्या ज्ञानाचा उपयोग करून उद्योग व व्यवसायाच्या क्षेत्रातही पुढे यावे, असे आवाहनही आव्हाड यांनी केले.

## संपादकीय

# अस्त विलक्षण व्यक्तिमत्वाचा

व्याकरण आणि भाषाशास्त्राच्या क्षेत्रात आयुष्यभर कार्य करणाऱ्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा. यास्मिन शेख यांच्या निधनाने एका विलक्षण व्यक्तिमत्त्वाचा अस्त झाला. त्यांनी मराठी भाषेला दिलेली वैचारिक समृद्धी, व्याकरणाकडे पाहण्याची त्यांची चिकित्सक दृष्टी आणि भाषेतील विविधतेचा त्यांनी केलेला स्वीकार यामुळे त्यांचे कार्य पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. प्रा. यास्मिन शेख यांचे मूळ नाव जेरुषा रुबेन. त्यांचा जन्म ज्यू कुटुंबात झाला. १९४९ मध्ये त्यांनी अझीझ अहमद इब्राहिम शेख यांच्याशी विवाह केला आणि त्यानंतर त्या यास्मिन शेख म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. विवाहानंतरही त्यांनी धर्म बदलला नाही. ही बाब त्यांच्या वैयक्तिक जीवनातील निवडीचा भाग असली, तरी तिचा व्यापक अर्थ अधिक महत्त्वाचा आहे. माणसाची सांस्कृतिक ओळख एखाद्या एका चौकटीत बंदिस्त असू शकत नाही. एखादी व्यक्ती जन्माने एका धर्माची, विवाहाने दुसऱ्या समुदायाशी जोडलेली आणि कर्माने तिसऱ्या सांस्कृतिक विश्वाची अविभाज्य भागीदार असू शकते. प्रा. शेख यांचे जीवन याच बहुविध भारतीयत्वाची साक्ष देते. भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसते. भाषा ही संस्कृती असते, इतिहास असते, समाजाची स्मृती असते आणि विचार करण्याची पद्धतही असते. मराठी भाषेचे व्याकरण शिकवताना शेख यांनी बहुधा याच व्यापकतेचा विचार पुढे ठेवला. म्हणूनच त्यांचे कार्य फक्त 'चूक-बरोबर' ठरवणाऱ्या व्याकरणतज्ज्ञाचे नव्हते. भाषेतील बदल, बोलींची समृद्धी, प्रमाणभाषेची आवश्यकता आणि समाजाच्या बदलत्या व्यवहारानुसार होणारे शब्दप्रयोग यांचा परस्परसंबंध समजून घेणाऱ्या त्या भाषाशास्त्रज्ञ होत्या. प्रा. यास्मिन शेख यांना प्रमाण भाषेचे महत्त्व मान्य होते; परंतु बोलीभाषांकडे कमीपणाने पाहण्याची वृत्ती मान्य नव्हती. ही भूमिका आज विशेष महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात मराठी एकसंध भाषिक अनुभव नाही. कोकणी, मालवणी, अहिराणी, वऱ्हाडी, झाडीबोली, खानदेशी, दखनी प्रभाव असलेली मराठी आणि असंख्य प्रादेशिक रूपे या सर्वांच्या संगमातून मराठीचे विशाल विश्व तयार झाले आहे. प्रमाण मराठी ही प्रशासन, शिक्षण आणि सार्वजनिक व्यवहारासाठी आवश्यक असली, तरी तीच 'खरी' मराठी आणि बोलीभाषा 'कमी दर्जाची' असे मानणे भाषेच्या लोकशाही स्वभावाला धक्का देणारे आहे. प्रा. यास्मिन यांच्यासारख्या अभ्यासकांनी व्याकरणाकडे अधिक समावेशक दृष्टिकोनातून पाहण्याची शिकवण दिली. भाषेची शुद्धता जपणे आवश्यक आहे; पण शुद्धतेच्या नावाखाली भाषेची विविधता नष्ट करणे चुकीचे आहे. प्रमाण भाषा आणि बोलीभाषा यांच्यात संघर्ष नाही, तर परस्परपूरक संबंध आहे. बोलीभाषा भाषेला जीवन देतात; प्रमाण भाषा तिला व्यापक संवादाचे व्यासपीठ देते. या दोन टोकांमध्ये संतुलन साधणारी भाषिक दृष्टी आजच्या मराठी समाजाला अधिक आवश्यक आहे. निधनानंतर त्यांची पुस्तके आणि व्याकरणविषयक कार्य यांची चर्चा होईल. 'मराठी लेखन मार्गदर्शिका', 'मराठी शब्दलेखन कोश' आणि 'सुगम मराठी व्याकरण कोश' यांसारखी पुस्तके विद्यार्थ्यांसाठी, लेखकांसाठी आणि भाषाप्रेमींसाठी उपयुक्त ठरली आहेत; मात्र त्यांच्या कार्याचा खरा गौरव केवळ पुस्तकांची यादी करून होणार नाही. भाषेच्या क्षेत्रात त्यांनी उभा केलेला विचारांचा वारसा पुढे नेण्यात त्यांचे स्मरण अधिक अर्थपूर्ण ठरेल.

'अंतर्नाद' मासिकाशी यास्मिन शेख यांचा दीर्घकाळ संबंध होता. 'व्याकरण सल्लागार' म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. ही ओळख वरकरणी साधी वाटली, तरी त्यामागे भाषेच्या सार्वजनिक वापराबाबतची मोठी जबाबदारी दडली आहे. लेखक, संपादक, विद्यार्थी आणि सामान्य वाचक यांच्या भाषाविषयक प्रश्नांना मार्गदर्शन करणे हे केवळ नियम सांगण्याचे काम नाही. प्रत्येक शब्दाचा संदर्भ, त्याचा वापर, त्यामागील अर्थ आणि बदलत्या भाषिक व्यवहाराचा विचार करावा लागतो. त्यामुळे 'व्याकरण सल्लागार' ही भूमिका प्रत्यक्षात भाषेच्या सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाची बौद्धिक जबाबदारी असते. आजच्या डिजिटल युगात व्याकरणाची जबाबदारी अधिक वाढली आहे. मोबाईलच्या पडद्यावर तयार होणारी भाषा वेगळी आहे. 'सोशल मीडिया'वरील मराठी वेगळी आहे. वृत्तपत्रातील मराठी, दूरदर्शनवरील मराठी, सरकारी कार्यालयातील मराठी आणि साहित्यिक मराठी यांमध्येही फरक आहे. इंग्रजी आणि हिंदीसह इतर भाषांमधून मराठीत मोठ्या प्रमाणात शब्द येत आहेत. रोमन लिपीत मराठी लिहिण्याची पद्धत वाढत आहे. 'चॅट', 'पोस्ट', 'रील', 'लिंक', 'अपडेट', 'डाउनलोड' यांसारखे शब्द दैनंदिन व्यवहाराचा भाग झाले आहेत. या बदलांकडे पाठ फिरवून भाषा जिवंत राहू शकत नाही. त्याच वेळी कोणताही विचार न करता परभाषिक शब्दांचा मारा स्वीकारला, तरी भाषेचे स्वतःचे सामर्थ्य कमी होऊ शकते, म्हणूनच आजच्या मराठीसमोरचा प्रश्न 'भाषा बदलावी की नाही?' हा नाही; तर 'भाषेतील बदल समजून घेत तिचे सामर्थ्य कसे वाढवायचे?' हा आहे. प्रा. यास्मिन यांच्या भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून या प्रश्नाचे उत्तर शोधायला हवे. शिक्षणातील मराठीचे स्थान, इंग्रजी माध्यमाचा वाढता प्रभाव, वाचनसंस्कृतीतील बदल, शुद्धलेखनाकडे होणारे दुर्लक्ष आणि नवीन पिढीचा बदलता भाषिक व्यवहार या साऱ्या चिंता खऱ्या आहेत; मात्र प्रत्येक समस्येचे उत्तर 'मराठी धोक्यात आहे' अशा भावनिक घोषणेतून मिळणार नाही. मराठी टिकवायची असेल, तर तिच्या ज्ञानपरंपरेला आधुनिक स्वरूप द्यावे लागेल. विज्ञान, तंत्रज्ञान, कायदा, अर्थशास्त्र, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल माध्यमांसाठी सक्षम मराठी विकसित करावी लागेल. नवीन शब्दसंपदा तयार करावी लागेल. भाषेच्या बदलत्या वापराचा शास्त्रीय अभ्यास करावा लागेल. या सर्व प्रक्रियेसाठी भाषातज्ज्ञांची नवी पिढी आवश्यक आहे. प्रा. यास्मिन यांच्या निधनाने ही उणीव प्रकर्षाने जाणवते. महाराष्ट्रात साहित्यिकांना मिळणारी प्रसिद्धी आणि भाषाशास्त्रज्ञांना मिळणारे सार्वजनिक स्थान यांमध्ये मोठी तफावत आहे. कवी, कथाकार, कादंबरीकार यांच्या कार्याची चर्चा होते. ती व्हायलाच हवी; पण भाषा ज्या पायावर उभी आहे, त्या व्याकरण, शब्दकोश, शब्दलेखन, भाषाशास्त्र आणि भाषिक संशोधनाच्या कामाकडे तुलनेने कमी लक्ष दिले जाते. एखाद्या भाषेचे वैभव केवळ तिच्या साहित्यावर टिकत नाही. तिच्या भाषावैज्ञानिक अभ्यासावरही टिकते. यास्मिन यांची कारकीर्द याच दृष्टीने महत्त्वाची ठरते.

# 'टाटा'मधला गलका, हवामानबदलाचा धसका

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे,**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**



विविध क्षेत्रांमधील आर्थिक घडामोडी सध्या तरंग उमटवत आहेत. सरत्या आठवड्यामध्ये घाऊक महागाई दर ९.७८ टक्क्यांवर पोहोचल्याने अनेक आर्थिक जाणकारांच्या मतांना महत्व प्राप्त झाले. दुसरी महत्वाची बातमी म्हणजे 'टाटा समूहा'तील सत्तासंघर्ष चर्चेत येणे. याच सुमरास समोर आलेली हवामानाचे संकट अन्नधान्याच्या किमती वाढवणार असल्याची बातमी लक्ष वेधणारी ठरली.

सरत्या आठवड्यामध्ये महागाई दर आणि टाटा कंपनीतील बातम्या चर्चेत राहिल्या. घाऊक महागाई दर ९.७८ टक्क्यांवर पोहोचल्याने अनेक आर्थिक जाणकारांच्या मतांना महत्व प्राप्त झाले. दुसरी महत्वाची बातमी म्हणजे 'टाटा समूहा'तील सत्तासंघर्ष चर्चेत येणे. याच सुमरास समोर आलेली हवामानाचे संकट अन्नधान्याच्या किमती वाढवणार असल्याची बातमी लक्ष वेधणारी ठरली.

अलिकडेच 'टाटा सन्स'चे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांच्या राजीनाम्याच्या चर्चेमुळे टाटा समूहातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले. चंद्रशेखरन आणि नोएल टाटा यांच्यात कॉर्पोरेट गव्हर्नन्स, उत्तराधिकार आणि समूहाच्या भविष्यातील रणनीतीवरून मतभेद असल्याच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील बॉम्बे हाउसच्या तीन दशकांपूर्वीच्या सत्तासंघर्षाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. १९९१ मध्ये जेआरडी टाटा यांचे उत्तराधिकारी म्हणून रतन टाटा यांनी 'टाटा सन्स'च्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. त्या वेळी 'टाटा समूहा'ची रचना आजच्या तुलनेत अधिक विकेंद्रित होती. समूहातील प्रमुख कंपन्यांचे प्रमुख मोठ्या प्रमाणावर स्वतंत्रपणे निर्णय घेत होते. टाटा समूहाला एकसंध रणनीती आणि मजबूत केंद्रीय नियंत्रणाची गरज असल्याचे रतन टाटा यांचे मत होते. त्या काळात 'टाटा समूहा'तील तीन वरिष्ठ अधिकारी अत्यंत प्रभावशाली मानले जात होते. त्यात 'टाटा स्टील'चे रुसी मोदी, 'टाटा केमिकल्स'चे दरबारी सेठ आणि 'इंडियन हॉटेल्स'चे अजीत केरकर यांचा समावेश होता. या तिन्ही अधिकाऱ्यांचा आपापल्या कंपन्यांवर मोठा प्रभाव होता. त्यामुळे रतन टाटा यांनी समूहात केंद्रीय नियंत्रण मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर अंतर्गत संघर्ष निर्माण झाला. 'टाटा स्टील'चे तत्कालीन प्रमुख रुसी मोदी यांचा कंपनीवर मोठा प्रभाव होता; मात्र 'टाटा सन्स'सोबतच्या वाढत्या मतभेदांनंतर १९९३ मध्ये त्यांना 'टाटा स्टील'मधून बाहेर पडावे लागले.

यथावकाश 'टाटा केमिकल्स'मधील दरबारी सेठ यांच्याबाबतही नेतृत्व आणि उत्तराधिकाराच्या प्रश्नावर मतभेद निर्माण झाले. त्यांनाही समूहाबाहेर जावे लागले. 'इंडियन हॉटेल्स'चे अजीत केरकर यांच्याबाबतही असेच घडले. आर्थिक अनियमिततेच्या आरोपांच्या चौकशीनंतर ते 'टाटा समूहा'पासून दूर झाले. या घटनेनंतर 'टाटा समूहा'तील विविध कंपन्यांवरील केंद्रीय नियंत्रण अधिक मजबूत झाले. १९९० च्या दशकाअखेरीस 'टाटा सन्स' हे समूहातील महत्त्वाचे निर्णय, वरिष्ठ नियुक्त्या आणि 'टाटा ब्रँड'च्या वापराबाबत प्रभावी केंद्र बनले. पुढील काळात याच संस्थात्मक बदलांच्या आधारावर 'टाटा समूहा'ने मोठ्या आंतरराष्ट्रीय अधिग्रहणांकडे वाटचाल केली. दरम्यान, सध्याच्या काळात टाटा ट्रस्टस, नोएल टाटा आणि एन. चंद्रशेखरन यांच्यातील मतभेदांच्या चर्चेमुळे समूहाच्या नियंत्रणाचा आणि उत्तराधिकाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. आजची परिस्थिती १९९० च्या दशकापेक्षा वेगळी असली, तरी समूहाचे नियंत्रण, उत्तराधिकार, कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि कंपन्यांच्या स्वायत्ततेचे प्रश्न अद्याप महत्त्वाचे आहेत. त्यामुळे बॉम्बे 'हाउस'च्या तीन दशकांपूर्वीच्या सत्तासंघर्षाची तुलना सध्याच्या घडामोडींशी केली जात आहे.

पुढे आलेल्या अन्य एका महत्वाच्या आकडेवारीनुसार घाऊक बाजारातील महागाईच्या आघाडीवर केंद्र सरकार आणि सर्वसामान्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. जुलैमध्ये देशातील घाऊक महागाई दरात किंचित घट झाली. वाणिज्य मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, घाऊक मूल्य निर्देशांकावर (डब्ल्यूपीआय) आधारित महागाई दर जुलैमध्ये ९.७८ टक्क्यांवर आला. जूनमध्ये हा दर ९.८७ टक्के होता. घाऊक महागाई दरातील ही घट अत्यल्प असली तरी महत्त्वाची मानली जात आहे. जूनमधील ९.८७ टक्के महागाई दर हा नव्या 'डब्ल्यूपीआय' मालिकेत, ज्याचे आधार वर्ष २०२२-२३ आहे, आतापर्यंतचा सर्वाधिक दर होता. दरम्यान, जुलैमध्ये घाऊक महागाई दर सुमारे ९.९५ टक्क्यांवर राहण्याचा अंदाज 'रॉयटर्स'च्या सर्वे क्षणात व्यक्त करण्यात आला होता. प्रत्यक्षात महागाईचा दर अंदाजापेक्षा किंचित कमी राहिल्याने काहीसा दिलासा मिळाला. जुलैमध्ये घाऊक महागाई दरात झालेल्या घटीमागे इंधन आणि वीज क्षेत्राचा मोठा वाटा आहे. घाऊक बाजारात इंधनाच्या किमती कमी होणे अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक संकेत मानला जातो. कारण इंधनाच्या किमती कमी झाल्यास वाहतूक, मालवाहतूक आणि उत्पादन खर्चावर परिणाम होतो. परिणामी, उद्योगांच्या उत्पादन खर्चात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता असते. इंधन आणि वीजेच्या किमतींमध्ये दिलासा मिळाला असला तरी प्राथमिक वस्तू आणि उत्पादित वस्तूंच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे.

आकडेवारीनुसार, कच्चा माल, खनिजे आदींचा समावेश असलेल्या प्राथमिक वस्तूंच्या गटातील महागाई दर जूनमधील सात टक्क्यांवरून वाढून जुलैमध्ये ८.५२ टक्के झाला. त्याचप्रमाणे उत्पादित वस्तूंच्या महागाई दरातही वाढ झाली आहे. जूनमध्ये ७.४८ टक्के असलेला हा दर जुलैमध्ये ८.२९ टक्क्यांवर पोहोचला. त्यामुळे उद्योगक्षेत्रातील उत्पादन खर्चाचा दबाव अद्याप कायम असल्याचे स्पष्ट होते. उत्पादन खर्च वाढत राहिल्याचा परिणाम आगामी काळात ग्राहकांच्या खरेदी किमतींवर होण्याची शक्यता आहे. वरवर पाहता घाऊक महागाई दरात झालेली घट दिलासादायक असली, तरी त्यामागील कारणांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. या घटीमागे मुख्यतः इंधन आणि वीजेच्या किमतीतील मोठी घट आहे; मात्र खाद्यपदार्थ, प्राथमिक वस्तू आणि उत्पादित वस्तूंच्या किमती वाढत आहेत. त्यामुळे घाऊक महागाई कमी झाली असली, तरी सर्वसामान्य ग्राहकांच्या स्वयंपाकघराच्या बजेटवर त्याचा तातडीने सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता कमी आहे. आगामी काळात सणासुदीचा हंगाम सुरू होणार असल्याने खाद्यपदार्थांच्या मागणीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अन्नधान्य, भाजीपाला आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवणे हे केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेसमोरचे महत्त्वाचे आव्हान राहणार आहे. घाऊक महागाईतील घट ही निश्चितच सकारात्मक बाब आहे; मात्र इंधनाच्या दरांमुळे मिळालेला हा दिलासा टिकवायचा असल्यास खाद्यपदार्थ आणि उत्पादन क्षेत्रातील वाढता महागाईचा दबाव कमी करणे आवश्यक आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. जगभरातील अन्नधान्याच्या किमतींवर युद्धाबरोबरच आता हवामानबदलाचे संकटही मोठा परिणाम करू लागले आहे. युरोपमध्ये जून २०२६ मध्ये पसरलेल्या विक्रमी उष्णतेमुळे गहू, बार्ली, मका आणि ओट्ससह सुमारे ९० लाख टन धान्य उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे आगामी काळात जागतिक अन्नमहागाईचा दबाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या (एफएओ) आकडेवारीनुसार जुलैमध्ये जागतिक अन्न किंमत निर्देशांक वाढून १३१.१ अंकांवर पोहोचला. जानेवारी २०२३ नंतरची ही सर्वाधिक पातळी आहे. त्याच वेळी जागतिक अन्न कार्यक्रमाने (डब्ल्यूएफपी) अल नीनोची स्थिती अधिक तीव्र झाल्यास २०२७ च्या अखेरपर्यंत किमान ४.९ कोटी अतिरिक्त लोक तीव्र अन्न असुरक्षिततेच्या परिस्थितीत ढकलले जाऊ शकतात, असा इशारा दिला आहे. 'ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्स'च्या अंदाजानुसार, पुढील वर्षी युरोपमधील अन्नमहागाईवर होणारा हवामानाचा परिणाम युद्धापेक्षाही मोठा ठरू शकतो. जून २०२६ हा पश्चिम युरोपमधील आतापर्यंतचा सर्वाधिक उष्ण जून ठरला. फ्रान्समध्ये विक्रमी तापमानाची नोंद झाली. जर्मनी, डेन्मार्क आणि झेक प्रजासत्ताकातही तापमानाचे नवे विक्रम प्रस्थापित झाले. अनेक आठवडे तापमान ३८ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक राहिल्यामुळे पिकांना मोठा फटका बसला. युरोपीय धान्य व्यापाऱ्यांची संघटना कोसेरालने युरोपीयन महासंघ आणि ब्रिटनमधील धान्य उत्पादनाचा अंदाज कमी करून २८.६६ कोटी टन केला आहे. हा अंदाज यापूर्वीच्या अंदाजापेक्षा सुमारे ९० लाख टनांनी कमी आहे.

जागतिक अन्न बाजारासमोर आता युद्ध आणि हवामानबदल अशी दोन मोठी आव्हाने एकाच वेळी उभी आहेत. युद्धामुळे पुरवठा साखळी, वाहतूक आणि खतांच्या किमती प्रभावित होत आहेत, तर उष्णतेच्या लाटा, दुष्काळ आणि 'अल नीनो'मुळे थेट कृषी उत्पादनावर परिणाम होत आहे. यामुळे अन्नधान्याच्या किमतींमध्ये वाढ होण्याचा धोका केवळ एखाद्या देशापुरता मर्यादित राहिलेला नाही. प्रमुख उत्पादक देशांमध्ये हवामानाचा फटका बसल्याचा परिणाम जागतिक बाजारपेठेवर होतो. विशेषतः विकसनशील देशांमध्ये या संकटाचा परिणाम अधिक गंभीर होऊ शकतो. त्यामुळे आगामी काळात अन्नसुरक्षा हा केवळ कृषीक्षेत्राचा प्रश्न न राहता जागतिक अर्थव्यवस्था, हवामान धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित महत्त्वाचा विषय बनण्याची शक्यता आहे.

पान १ वरून

## मनोज जरांगे पाटलांचा मुंबईकडे एल्गार

हनुमान मंदिरात दर्शन घेतले. यावेळी महिलांनी औक्षण करून त्यांना निरोप दिला. मराठा समाजाने एकजुटीने राहावे आणि आंदोलनादरम्यान शांतता राखावी, असे आवाहन त्यांनी केले. जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी तिसऱ्यांदा परवानगीचा अर्ज दाखल केला आहे. दुपारपर्यंत परवानगी न मिळाल्यास उच्च न्यायालयात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. पुढील पाच दिवसांत ते मुंबईत पोहोचण्याचे नियोजन आहे. दरम्यान, जरांगे यांच्या प्रवासादरम्यान मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या गर्दीचे नियोजन असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेतली जात आहे. दरम्यान, पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर मराठा आंदोलकांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे. आम्ही आमच्या सोयीनुसार मुंबईत गणपती पाहायला जाणार आहोत. आम्हाला गणेशोत्सव पाहण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. जरांगे पाटील बोलावतील, तेव्हा आझाद मैदानात जमा होऊ, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली आहे. जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने निघाल्याने आता त्यांना मुंबईत प्रवेश मिळतो की वेशीवरच अडवले जाते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## पालकमंत्री विखे पाटलांचे आश्वासन पूर्ण

मांडण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकारने खंडकरी शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय करून शेतकर्याच्या जमीनी पुन्हा त्यांच्या नावावर करण्याचा निर्णय केला होता. शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या हरेगाव मळ्यातील अकारी पडीत जमीनी शेतकऱ्यांच्या नावावर कराव्यात आशी मागणी घेवून शेतकरी नेते अजित काळे यांनी हरेगाव येथे असंख्य शेतकऱ्यांच्या उपस्थितीत एक महीन्यापुर्वी आंदोलन केले होते. मंत्री विखे पाटील यांनी आंदोलन स्थळी जावून शेतकऱ्यांची भेट घेवून जमीनी शेतकऱ्यांच्या नावावर होईपर्यत कराव्या लागणाऱ्या सर्व संघर्षात मी तुमच्या बरोबर असल्याची ग्वाही दिली होती. शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमीनीचा निर्णय तातडीने व्हावा म्हणून या प्रश्ना संदर्भात मंत्री विखे पाटील यांनी राज्यपाल, मुख्यमंत्री, महसूल मंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.अनेकवेळा शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळा समवेत बैठका घेवून सर्व स्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला होता. त्याचा सकारत्मक परीणाम म्हणून राज्य मंत्रीमंडळाच्या सोमवारच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय घेण्यात आला. यापुर्वी हरेगाव येथील जमीन उद्योगांना देण्याचा निर्णय झाल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण करून देण्याचेही प्रयत्न झाले. पण शेतकऱ्यांचे हक्क डावलून कोणताही निर्णय होणार नसल्याची भूमिका ठामपणे विखे पाटील यांनी मांडली होती. राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत जमीनी मूळ मालकांना देण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे मंत्री विखे पाटील यांनी स्वागत केले असून महायुती सरकारमुळे वर्षानुवर्ष कराव्या लागलेल्या संघर्षाला मोठे यश मिळाले आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे मंत्री विखे पाटील यांनी आभार मानले आहेत.

## पक्ष-चिन्हाची निर्णायक लढाई

ही सुनावणी झाली. उद्धव ठाकरे गटाचा युक्तिवाद यापूर्वीच पूर्ण झाला असून, आता शिंदे गटाकडून आपली बाजू मांडण्यात येत आहे. कौल यांनी शिवसेनेच्या पक्षघटनेतील तरतुदी, संघटनात्मक रचना तसेच निवडणूक आयोगाच्या अधिकारांचा मुद्दा न्यायालयासमोर मांडला. १९९९ मधील शिवसेनेच्या घटनेचा संदर्भ देताना त्यांनी पक्षातील प्रतिनिधी सभेला असलेले महत्त्व स्पष्ट केले. शिवसेना प्रमुख पदाची निवड प्रतिनिधी सभेच्या बैठकीनंतर होत असल्याचा दावा त्यांनी केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर २०१३ मध्ये शिवसेना प्रमुख हे पद गोठवण्यात आले होते. त्यानंतर २०१८ मध्ये पक्षप्रमुख हे पद निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला; मात्र ही प्रक्रिया पक्षघटनेनुसार योग्य नसल्याचे कौल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच पक्षाची नवीन घटना आणि नवीन संघटनात्मक रचनेची माहिती निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आली नसल्याचा युक्तिवादही त्यांनी केला. निवडणूक आयोग पक्षाबाबत निर्णय घेताना प्रथम पक्षाची घटना, त्यानंतर संघटनात्मक रचना आणि त्यानंतर विधिमंडळातील संख्याबळाचा विचार करतो, असा दावा कौल यांनी केला. भारतीय संविधानातील कलम ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाला व्यापक अधिकार असल्याचेही त्यांनी नमूद केले. शिवसेना पक्षातील वाद हा केवळ विधिमंडळ पक्षातील फुटीपुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद मूळ राजकीय पक्षातही उमटले होते, असा शिंदे गटाचा दावा आहे. आम्ही केवळ विधिमंडळ पक्षात फूट पडल्याच्या आधारावर निवडणूक आयोगाकडे गेलो, असे म्हणणे चुकीचे असल्याचे कौल यांनी स्पष्ट केले. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष या दोन्ही स्तरांवर मतभेद व फूट निर्माण झाली होती, असेही त्यांनी सांगितले. पक्षांतर्गत लोकशाहीचा मुद्दाही कौल यांनी मांडला. कार्यकर्त्यांमध्ये असंतोष होता आणि निवडणुकीपूर्वीच्या वैचारिक भूमिकेपासून दूर जाऊन विरोधी विचारांच्या पक्षांसोबत सरकार स्थापन करण्यात आल्याने कार्यकर्त्यांना अडचणींचा सामना करावा लागला, असा दावा त्यांनी केला. राजकीय पक्षाचा खरा आधार हा त्याचे कार्यकर्ते आणि तळागाळातील संघटनात्मक रचना असल्याचे सांगत संघटनात्मक बहुमताची चाचण घेणे आवश्यक असल्याचे कौल यांनी नमूद केले. निवडणूक आयोग प्रत्येक प्राथमिक सदस्याचे सार्वमत घेऊ शकत नाही. त्यामुळे पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील बहुमताचा विचार करणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला.

## ट्रॅक्टरखाली चिरडून चिमुकल्याचा मृत्यू

नागरिकही सुन्न झाले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईक, ग्रामस्थ आणि नागरिकांनी मते यांच्या घराकडे धाव घेतली. कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचेही डोळे पाणावले. लहानग्या देवांशच्या अकाली मृत्यूमुळे मते कुटुंबाचा गणेशोत्सवाचा आनंद क्षणात दुःखात बदलला. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, चिमुकल्याच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

## नागरिकांच्या अपेक्षांनुसार गावविकासाचा ध्यास

विषय आहे. जनतेच्या अपेक्षा आणि मागण्या लक्षात घेऊन विकासकामांचा सातत्याने पाठपुरावा करत राहू, असे प्रतिपादन आ. काशिनाथ दाते यांनी केला. पाडळी आळे परिसरातील विविध विकासकामांना चालना देणाऱ्या ७५ लाख ३७ हजार रुपयांहून अधिकच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आ. काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. रस्ते, अंगणवाडी इमारत, गावठाणातील जागा तसेच श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरातील पेव्हिंग ब्लॉक आदी कामांचा यामध्ये समावेश आहे. आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून पाडळी आळे परिसरातील विविध विकासकामांचा सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. त्याअनुषंगाने सुमारे ७५.३७ लाख रुपये खर्चाच्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण, तर प्रस्तावित कामांचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले. यामध्ये पाडळी आळे परिसरातील रस्ते, अंगणवाडी इमारत, गावठाणातील जागा आणि श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरातील पेव्हिंग ब्लॉकच्या कामांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच गावठाणातील बेंद वस्ती खडीकरण व मुरमीकरण आणि शासनाच्या संबंधित निधीतून ग्रा.मा. ७६१ ते चेतन येवले यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याच्या खडीकरण व मुरमीकरणाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, वसंतराव चेडे, आर. एस. कापसे, सचिन पाटील वराळ, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, दिनेश बाबर, रेश्मा गलांडे, राजेंद्र उबाळे, लक्ष्मण डेरे, प्रविण चौधरी यांसह आदी उपस्थित होते. पाडळी आळेच्या सरपंच कविता डेरे म्हणाल्या की, आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून पाडळी आळे गावामध्ये विकासकामांना सातत्याने गती मिळत आहे. रस्ते, पाणी, शिक्षण, सार्वजनिक सुविधा आणि ग्रामीण भागातील मूलभूत गरजांना प्राधान्य देत विकासाची कामे प्रत्यक्षात आणली जात आहेत, ही समाधानाची बाब आहे. उपलब्ध निधीसाठी योग्य पाठपुरावा करून तो मतदारसंघाच्या विकासासाठी आणण्याची त्यांची कार्यपद्धती कौतुकास्पद आहे. गावागावांत विकास पोहोचवून संपूर्ण मतदारसंघाच्या प्रगतीची वाटचाल गतिमान करण्याचे काम त्यांच्या नेतृत्वातून होत आहे.

## घुलेंचा वारकरी-शेतकरी एकतेचा विचार प्रेरणादायी

सध्या दुष्काळाचे संभाव्य संकट समोर आहे. त्यामुळे शेतीबरोबरच घरातील व्यवस्थापनही काटकसरीने करणे आवश्यक आहे. पाणी आणि पैसा जपून वापरावा लागेल. संकट येण्यापूर्वी चिंतन केले तर पश्चात्तापाची वेळ येत नाही. चिंतेत न जाता चिंतनातून मार्ग काढण्याचा संदेश संत परंपरेने दिला आहे. कोणत्याही क्षेत्रात प्रगती हळूहळू होत असते, त्यासाठी संयम आणि धीर आवश्यक आहे. ज्ञानेश्वर उद्योग समूहाची वाटचाल मोठ्या उमेदीने सुरू असून त्याला सर्वांनी साथ व पाठबळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. नरेंद्र घुले पाटील म्हणाले की, सध्या दुष्काळी परिस्थिती असल्याने एकरी ऊस उत्पादनाबरोबरच साखर उत्पादनातही घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने साखर उतारा घट अनुदान द्यावे. शेतीला पूर्णवेळ वीज देता येत नसेल तर वीजबिल व शेतीकर्ज माफ करावे तसेच चारा तगाई द्यावी. जायकवाडी व मुळा धरणाच्या पाण्यावर परिसरातील शेतकऱ्यांचा पहिला हक्क आहे. जिल्हा बँकेच्या माध्यमातून माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील यांनी शेतकऱ्यांना पाइपलाइनसाठी कर्ज उपलब्ध करून दिले आहे. श्रमाला प्रतिष्ठा आणि मनोबल उंचावणारा हा कार्यक्रम आहे. प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून जास्तीत जास्त ऊस उत्पादन घेण्याचे नियोजन करावे. सर्वांच्या सहकार्याने आगामी हंगाम यशस्वीपणे पूर्ण करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी आ. पांडुरंग अभंग म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीमुळे ऊसाची पुरेशी वाढ झालेली नाही. त्यातच हुमणी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने एकरी ऊस उत्पादन कमी होऊन साखर उताऱ्यात एक ते दीड टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने ऊस उत्पादकांना प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. कार्यक्रमास जनार्दन पटारे, अरुण लांडे, सुधाकर लांडे, रामजी आंधळे, दादासाहेब गंडाळ, सखाराम लव्हाळे, विष्णूपंत जगदाळे, बाळासाहेब मरकड, रामभाऊ जगताप, भावराव भोंगळे, अजित मुरकुटे, डॉ. शिवाजी शिंदे, अशोक वायकर, भाऊसाहेब आगळे, शिवाजीराव गवळी, मारुतराव घुले पतसंस्थेचे अध्यक्ष बबनराव धस, कामगार संचालक सुखदेव फुलारी, कामगार संघटनेचे सचिव संभाजीराव माळवदे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालक अशोकराव मिसाळ यांनी आभार मानले.

## ...अखेर हरेगावच्या भूमिपुत्रांना न्याय

राबविण्यात येणार आहे. वर्षभर चालणाऱ्या या प्रक्रियेत शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ, अंमलबजावणीतील अडचणी, खर्च आणि परिणामकारकता यांचा अभ्यास केला जाणार आहे. त्यातून भविष्यातील धोरणनिर्मिती आणि योजनांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यास मदत होणार आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी नगरपरिषदेला व्यापारी संकुल उभारण्यासाठी शासनाची ६ हजार २४०.३० चौरस मीटर जमीन विनामूल्य देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या निर्णयामुळे नगरपरिषदेला स्थानिक पातळीवर व्यापारी सुविधा विकसित करता येणार आहेत. व्यापारी संकुलामुळे स्थानिक व्यापाऱ्यांना जागा उपलब्ध होण्याबरोबरच रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी या निर्णयाचा उपयोग होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक शाखेला अभ्यासिका आणि वाचनालयासाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या मालकीची अभ्यासिका व वाचनालयाची इमारत भाडेपट्ट्याने देताना होणाऱ्या भाडेपट्टा करारनाम्याच्या नोंदणीवरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या निर्णयामुळे साहित्य, वाचन आणि अभ्यासाच्या क्षेत्रातील उपक्रमांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे. राज्यातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या सुधारणांमुळे नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजात अधिक स्पष्टता आणि सुसूत्रता आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पाच्या अध्यक्षांच्या कार्यालयाचे कामकाज अधिक प्रभावीपणे चालविण्यासाठी चार नवीन पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या पदांमुळे प्रकल्पाशी संबंधित प्रशासकीय कामकाजाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. तसेच या पदांसाठी लागणाऱ्या खर्चाच्या तरतुदीलाही मंजुरी देण्यात आली.

# जिल्ह्यात तब्बल ३३९२ गणपतींची स्थापना

## लहान-मोठ्या गणेशमूर्तीसह 'एक गाव एक गणपती' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यात गणेशोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून, यंदा मोठ्या संख्येने गणपतींची स्थापना झाली. उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्ह्यात एकूण ३३९२ गणपतींची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये १४३४ लहान आणि १५२५ मोठ्या सार्वजनिक गणपतींचा, तसेच २५५ एक गाव, एक गणपती उपक्रमांचा समावेश आहे.

याशिवाय १८ खाजगी गणपतींची नोंद करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध सार्वजनिक मंडळांनी सजावट, देखावे आणि धार्मिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन सुरू केले आहे. एक गाव, एक गणपती उपक्रमामुळे गावागावांत एकोपा आणि सामाजिक सलोखा वाढण्यास मदत होत आहे. गर्दी, वाहतूक व्यवस्था, ध्वनिप्रदूषण आणि सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाकडून नियोजन केले जात आहे. शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

३३९२ गणेश मंडळांची नोंदयंदाच्या गणेशोत्सवासाठी जिल्ह्यात मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सव साजरा होणार आहे. जिल्ह्यात एकूण ३३९२ गणपती मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये १८ खाजगी गणपती, सार्वजनिक स्वरूपातील १४३४ लहान आणि १५२५ मोठ्या गणपतींच्या मूर्ती, तसेच २५५ एक गाव, एक गणपती उपक्रमांचा समावेश आहे.

त्यामुळे यंदाचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होणार असल्याचे चित्र आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी उत्सवाची तयारी वेगाने सुरू केली आहे. उपलब्ध मंडळनिहाय आकडेवारीनुसार जिल्ह्यातील विविध भागांत लहान-मोठ्या गणपतींची स्थापना होणार आहे. १४३४ लहान आणि १५२५ मोठ्या सार्वजनिक गणपतींची नोंद करण्यात आली आहे. अनेक मंडळांकडून आकर्षक सजावट, देखावे आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे. पोलिसांकडूनही आवश्यक नियोजन केले जात आहे

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव ठरावा, यासाठी विविध मंडळांकडून प्रयत्न केले जाणार आहेत. मोठ्या संख्येने गणपतींची स्थापना होत असल्याने वाहतूक, गर्दी, ध्वनिप्रदूषण आणि सुरक्षितता या बाबींवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. मंडळांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, तसेच नागरिकांनीही उत्सवात शिस्त राखावी, अशी अपेक्षा आहे.

### २५५ एक गाव एक गणपती

ावागावांत सामाजिक सलोखा आणि एकोपा वाढविण्यासाठी एक गाव, एक गणपती उपक्रमाला यंदाही चांगला प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यात २५५ ठिकाणी एक गाव, एक गणपती संकल्पनेनुसार स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय संभाव्य गणपती स्थापनेच्या आकडेवारीत २५५ एक गाव, एक गणपती, ५८ खाजगी आणि ३०५९ सार्वजनिक गणपती, अशी एकूण ३३९२ स्थापना अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे धार्मिक उत्सवासोबत सामाजिक एकात्मतेचा संदेशही या उपक्रमातून दिला जाणार आहे.

# शिक्षकांच्या प्रश्नांसाठी 'दरबार' ठरतोय प्रभावी

## नाना डोंगरे; आमदार किशोर दराडे यांचा सत्कार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रत्यक्ष संवाद साधून ते सोडविण्यासाठी आमदार दराडे यांनी शिक्षक दरबाराच्या माध्यमातून सातत्यपूर्ण पुढाकार घेतला आहे.

स्थानिक पातळीवर अनेक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहतात. अशा प्रश्नांची दखल घेऊन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत ते मार्गी लावण्यास शिक्षक दरबारामुळे मदत झाली आहे. आपल्या कामातून शैक्षणिक चळवळीला गती देत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा आमदार दराडे यांचा प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे पै. नाना डोंगरे यांनी सांगितले.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न सातत्याने मार्गी लावण्यासाठी शिक्षक दरबाराच्या माध्यमातून प्रयत्न करणारे शिक्षक आमदार किशोर दराडे यांचा सामाजिक कार्यकर्ते तथा नाना डोंगरे यांनी सत्कार केला. अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीला आमदार किशोर दराडे यांनी भेट दिली असता हा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब बोडखे, संभाजी पाटील, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, सुनील पंडित, महेंद्र हिंगे, दिलीप काटे, वैभव सांगळे, अशोक आव्हाड, सुनील भोर, सचिन झगडे, आदी उपस्थित होते.

अहमदनगर जिल्ह्यातील कुस्ती क्षेत्राशी असलेल्या जुन्या परिचयाचा उल्लेख करत आमदार किशोर दराडे यांनी यावेळी जुन्या आठवणींना उजाळा दिला. कुस्ती क्षेत्रातील विविध व्यक्तींशी असलेले ऋणानुबंध आणि त्या काळातील आठवणी सांगितल्या.

# 'विघ्नहर्ता'ने सभासदांचा विश्वास जिंकावा

## तुळशिराम महाराज सरकटे; निघोज शाखेचे स्थलांतर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : संस्थापक , चेअरमन सुभाषराव साठे यांच्या नेतृत्वाखालील विघ्नहर्ता सहकारी पतसंस्थेनी योग्य ठिकाणी गुंतवणूक करून सभासद ठेवीदारांचा विश्वास जिंकत ठेवीदारांची संख्या वाढवून संस्थेचा विस्तार करावा , असे प्रतिपादन ब्रम्हमुर्ती हभप तुळशिराम महाराज सरकटे यांनी केले. विघ्नहर्ता पतसंस्थेच्या निघोज शाखेचे भाड्याच्या जागेतून बसस्थानकाजवळील स्वमालकीच्या प्रशस्त जागेत गणपती चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर ब्रह्ममूर्ती हभप तुळ-शीराम महाराज सरकटे यांच्या हस्ते स्थलांतर कार्यक्रम मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला.यावेळी अण्णा बढे, अर्जुन रासकर, सेवानिवृत्त प्राचार्य शिवाजीराव पिंपरकर, सुभाषराव खोसे, संजयराव बढे, रुपेश ढवण, हभप निवृत्ती महाराज तनपुरे आणि सरपंच प्रविण उदमले यांनी मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना ब्रह्ममूर्ती हभप तुळशीराम महाराज सरकटे पुढे म्हणाले की, चेअरमन सुभाषराव साठे यांचा स्वभाव सात्त्विक असून, कष्ट, विचार आणि चिकाटी यांच्या जोरावर त्यांनी सहकार क्षेत्रात मोठी वाटचाल केली आहे. नोकरी करत असताना पतसंस्था स्थापन करण्याचा त्यांनी घेत-लेला निर्णय कौतुकास्पद आहे. कार्यक्रमास ॲड. बाळासाहेब लामखडे, शिवाजीराव वराळ, प्रमोद आहेर, बबनराव थोरात, सोमनाथ वरखडे, रमेश वाढवणे, दत्ता नरवडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. चेअरमन सुभाषराव साठे यांनी सांगितले की, निघोज शाखेचा शुभारंभ सुमारे सहा वर्षांपूर्वी झाला.

मळगंगा पतसंस्था तसेच निघोज नागरी पतसंस्थेत नोकरी करताना सहकार क्षेत्राचा अनुभव मिळाला. पतसंस्था काढण्याचा विचार मनात नसतानाही परिस्थिती आणि समाजसेवेची भावना यामुळे हा उपक्रम सुरू केला. आपल्या हातून काहीतरी जन-सेवेचे कार्य घडावे, या उद्देशाने विघ्नहर्ता पतसंस्थेची वाटचाल सुरू केली असल्याचे त्यांनी सांगितले.

# पारनेर महाविद्यालयाची डिजिटल भरारी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : काळ्या फळ्याची जागा आता अत्याधुनिक डिजिटल स्क्रीनने घेतली असून, पारंपरिक अध्यापन पद्धतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत पारनेर महाविद्यालयाने डिजिटल शिक्षणाच्या दिशेने एक मोठी झेप घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाविद्यालयातील तब्बल ३० वर्गखोल्यांमध्ये डिजिटल स्क्रीन, तर प्रयोगशाळा आणि इतर वर्गांमध्ये ३५ प्रोजेक्टरची सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण पावलामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आता खऱ्या अर्थाने स्मार्ट शिक्षणाची दारे खुली झाली आहेत.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित अध्ययनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या नव्या सुविधांमुळे आता वर्गातील वातावरण अधिक जिवंत आणि संवादात्मक होणार आहे. विशेषतः विज्ञान शाखेतील क्लिष्ट संकल्पना आणि प्रयोग आता व्हिडिओ, रंगीत आकृत्या आणि डिजिटल सादरीकरणाच्या माध्यमातून अधिक सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे शिक्षकांना शक्य होणार आहे.

पारंपरिक वर्गखोल्यांचे आता स्मार्ट क्लासरूममध्ये रूपांतर झाल्यामुळे पारनेर महाविद्यालय हे परिसरातील शैक्षणिक क्षेत्रासाठी एक आदर्श ठरत आहे.

# ललवाणी यांचे ५१ दिवसाचे उपवास

## उद्या होणार उपवासाची पुर्णाहुती सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : येथील जैन स्थानकमध्ये चातुर्मास निमित्त आलेल्या श्रमण संघाच्या उपप्रर्वतिनी साध्वीजी चंदनबालाजी व जिनशासन प्रभाविका प. पू. पद्मावत-ीजी व त्यांच्या सुशिष्या यांच्या प्रेरणे-ने व आशिर्वादाने शहरातील धार्मिक व सामाजीक कार्येकर्ते पंकज धनराज ललव-ाणी यांनी लगातार ५१ दिवसाचे निरंकार उपवासाची तपश्चर्या आनंदमय व मंगलमय वातावरणात सुरु आहे. पंकज ललवाणी यांचे ५१ दिवसाच्या उपवासाची पुर्णाहुती सोहळा गुरुवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज रोड वरील जैन स्थानक मध्ये उपस्थित असलेल्या साध्वीजींच्या मुखरविद्या व मंत्रोपचाराने होणार आहे. पंकज ललव-ाणी हे तपस्वी श्रीरामपूर मधील प्रमुख व्यापारी व सामाजिक कार्येकर्ते स्वर्गीय कचरदास ललवाणी व श्रीमती मदनबाई कचरदास ललवाणी यांचे नातु तर स्वर्गीय धनराज ललवाणी यांचे सुपुत्र आहे. प्रत्येक चातुर्मास मध्ये ते तपसाधना करतात. गतवर्षी २०२५ मध्ये त्यांनी ३१ उपवासाची तपश्चर्या केली होती. त्यांच्या धार्मिक व सामाजिक कार्यात नेहमीच सहभाग असतो.गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता जैन स्थानक मध्ये होणाऱ्या तपपुर्ती सोहळ्यास सकल जैन समाजाने उपस्थित रहावे असे आवाहन ललवाणी परिवार व त्यांचे आप्तेष्ट तसेच जैन श्रावक संघ, श्रीरामपूर चार्तुमास व दिक्षा कमिटी व सकल जैन समाजाने केले आहे.

# श्रीरामपूर बसस्थानकाचा होणार कायापालट

## ९ कोटी ८१ लक्ष रुपयांच्या कामाचा आमदार ओगले यांच्या हस्ते शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर श्रीरामपूर बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचा सुमारे ९ कोटी ८१ लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे उपस्थित होते. यावेळी आमदार हेमंत ओगले म्हणाले की, गेल्या दिड वर्षांपासून श्रीरामपूर बस स्थानकाच्या पुनर्बांधणीच्या कामाचा पाठपुरवा शासन दरबारी सुरु होता.

अनेक अडचणी आल्या राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात देखील या विषयासंदर्भात बैठका घेण्यात आल्या आणि आज या सगळ्या पाठपुराव्याला यश आले असून चांगल्या प्रकारचे काम श्रीरामपूर बस स्थानकाचे होईल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी आमदार ओगले यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानले.

नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, आमदार हेमंत ओगले यांनी विधानसभा निवडणुकीनंतर श्रीरामपूर बस स्थानकाचा विषय लावून धरला अधिवेशन असो अथवा मंत्रालय या ठिकाणी सातत्याने पाठपुरावा केल्याने आज या कामाला मंजुरी मिळाली आहे.

या बस स्टँडच्या विकासामुळे निश्चितच श्रीरामपूरच्या सौंदर्यात भर पडणार असल्याचे देखील शासन यांनी म्हटले. यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन गुजर ,जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, मार्केट कमिटीचे सभापती सुधीर नवले, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, सभापती दिपक वमने, योगेश जाधव, नगरसेवक गोपाल लिंगायत, अशोक उपाध्ये, उपस्थित होते.

# प्रवरा बँकेने औद्योगिक क्रांतीत उतरावे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : अहिल्यानगर जिल्हा औद्योगिक विकासाचे केंद्र म्हणून वेगाने पुढे येत असून, नव्या उद्योगांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी प्रवरा सहकारी बँकेने आपली भूमिका अधिक व्यापक करावी, असे आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

प्रवरा सहकारी बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विखे पाटील म्हणाले, शिर्डीसह हरेगाव, बेलवंडी, अहिल्यानगर व राहुरी येथे औद्योगिक वसाहतींसाठी जागा उपलब्ध होत आहे. मोठ्या गुंतवणुकीसाठी उद्योजक पुढे येत असल्याने बँकेने उद्योगांशी आर्थिक संबंध मजबूत करावेत. छोटे व्यावसायिक, उद्योजक व कर्जदारांना अधिक कर्जपुरवठा करण्याची गरज आहे.

केवळ पाच हजार रुपयांच्या ठेवींवर सुरू झालेल्या प्रवरा बँकेने आज एक हजार कोटींच्या ठेवी आणि १,८०० कोटींच्या व्यवसायाचा टप्पा गाठला आहे. सलग तिसऱ्या वर्षी शून्य टक्के एनपीए राखण्यात बँकेला यश आले आहे. बदलत्या बँकिंग क्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञान स्वीकारून व्यवसायविस्तार करण्याचे आवाहनही त्यांनी केले. अहिल्यानगरमध्ये नव्या औद्योगिक वसाहती आणि मोठी गुंतवणूक येत आहे. या उद्योगांना वित्तपुरवठा करून रोजगारनिर्मितीला चालना देण्याची संधी प्रवरा बँकेसमोर आहे.

सभासदांच्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त करताना यंदा १० टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

# कर्जत बसस्थानक परिसरात 'मॉकड्रिल'

## नियंत्रणाचे प्रात्यक्षिक; सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची सज्जता



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : शेतीमालाला भाव मिळालाच पाहिजेच्या घोषणांनी कर्जत बसस्थानक परिसर दणाणला. आक्रमक जमाव, हवेत तीन वेळा गोळीबार, अश्रुधुराच्या दोन नळकांड्या आणि आंदोलकांची धावपळ, असे चित्र दिसले. मात्र, हा प्रत्यक्ष संघर्ष नसून आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कर्जत पोलिसांनी केलेला दंगल नियंत्रणाचा सराव होता. पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या प्रात्यक्षिकात शेतकऱ्यांचा मोर्चा आक्रमक झाल्याचे दाखविण्यात आले. पोलिसांच्या वारंवार सूचनांनंतरही जमाव नियंत्रणात येत नसल्याचे दाखवून हवेत तीन वेळा गोळीबार करण्यात आला. त्यानंतर अश्रुधुराच्या दोन नळकांड्या फोडण्यात आल्या. धूर पसरताच आंदोलकांची धावपळ उडाली. त्यानंतर आंदोलक पोलिसांवर दगडफेक करीत असल्याचे दाखविण्यात आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून परिस्थिती नियंत्रणात आणत आंदोलकांची धरपकड केली. दंगलसदृश्य परिस्थितीत पोलीस यंत्रणेची कार्यपद्धती व तत्परता यावेळी सादर करण्यात आली. सरावानंतर पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांनी आगामी गणेशोत्सवासह सर्व सण शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे सांगितले. कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई केली जाईल. नागरिकांनी शांततेत सण साजरे करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

# विठ्ठल मूर्तीच्या वज्रलेपासाठी तीन दिवस दर्शन बंद

## दि. २३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत होणार वज्रलेप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पंढरपूर** : गेथील श्री विठ्ठल मंदिर दि. २३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत दर्शनासाठी (मुख दर्शन व पदस्पर्श) बंद राहणार आहे. श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या जतन -संवर्धनासाठी वज्रलेप करण्यात येणार आहे. भारतीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्तिसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हे संवर्धन केले जाणार आहे. त्यामुळे तीन दिवस दर्शन घेता येणार नाही, अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समित्तीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

येथील श्री विठ्ठल आणि रुक्मिणीमातेची मूर्तीचे जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार



मूर्तीची ही वज्रलेप प्रक्रिया केली जाते. यापूर्वी सन १९८८, २००५, २०१२ आणि २०२० या कालावधीत मूर्तीचा वज्रलेप करण्यात आला होता. मागील प्रक्रियेस सुमारे पाच वर्षांचा कालावधी झाल्याने मूर्तीची नियमित देखभालीच्या अनुषंगाने हे काम पुन्हा देण्यात येणार आहे. मात्र या वेळी ही प्रक्रिया करताना सुरुवातीला वारकरी, देशातील विविध मंदिरांतील तज्ज्ञ मंडळींनी वज्रलेप प्रक्रियेला विरोध केला. त्यानंतर येथील गणेश लंके व इतर या याचिकाकत्यांनी दिवाणी न्यायालय, पंढरपूर येथे दावा दाखल केला.

यामध्ये न्यायालयाने स्थगिती दिल्याने बज्रलेपाचे काम करता आले नव्हते. त्यानंतर जिल्हा न्यायालय, सोलापूर व उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ कोल्हापूर येथे श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन संवर्धन करण्याच्या दृष्टीने मंदिर समितीने घेतलेल्या भूमिकेला ७ ऑगस्ट रोजी दिलेल्या अंतिम आदेशाद्वारे महत्त्वपूर्ण न्यायालयीन अधिमान्यता दिली. मात्र, आषाढी यात्रा आल्याने ही प्रक्रिया करता आली नाही.

या संदर्भात पुरातत्त्व विभागाचे अधिकारी यांच्च्या समवेत मंदिर समितीची दि. १३ सप्टेंबर रोजी दूरइष्यप्रणालीद्वारे सहअध्यक्ष महिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. या सभेत मंदिर समितीचे सदस्य, तसेच कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, तसेच भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणचे (एएसआय) उपअधीक्षक डॉ. एस. विनोद कुमार, राज्य पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुज्जरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन-संवर्धन कामाचे ठेकेदार प्रतिनिधी, मंदिर समितीचे सर्व खातेप्रमुख उपस्थित होते. बैठकीत लेपनप्रक्रियेची तारीख निश्चित करण्यात आली.

### लेपन प्रक्रियेला रात्री सुरुवात

लेपन प्रक्रियेला २२ सप्टेंबरला देवाची दर्शनाची वेळ झाल्यावर म्हणजे रात्री लेपनाच्या कामाला सुरुवात केली जाणार आहे. पुढे २३, २४ आणि २५ सप्टेंबर असे तीन दिवस ही प्रक्रिया करणार आहे. या तीन दिवसांत देवाचे मुख व पदस्पर्श दर्शन भाविकांसाठी बंद ठेवणार आहे. भारतीय पुरातत्त्व विभाग, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्तिसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल व रुक्मिणीच्या मूर्तीचे संवर्धन केले जाणार आहे.

# गणेशोत्सवाच्या गर्दीत अनधिकृत फ्लेक्सची भर

## फ्लेक्सबाजीने संगमनेरचे सौंदर्य धोक्यात; वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर; गणेश भक्तांमध्ये नाराजी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहर हे वैभवशाली आणि आर्थिक संपन्न बनले आहे. शेतकरी व्यापारी विद्यार्थी नागरिक महिला या सर्वांसाठी हे शहर अत्यंत वैभवशाली असून गणेश उत्सवानिमित्त संगमनेर शहरात नागरिकांची मोठी गर्दी झाली मात्र महायुतीच्या अनाधिकृत फ्लेक्समुळे वाहतूक कोंडीसह शहराचे विद्रूपीकरण होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

संगमनेर शहर हे सुसंस्कृत व आर्थिक दृष्ट्या संपन्न शहर म्हणून ओळखले जाते. यामुळे नागरिकांची राहण्यासाठी शहरांमध्ये पहिली पसंती आहे. याचबरोबर मोठी बाजारपेठ विश्वास प्रामाणिकपणा यामुळे आजूबाजूच्या तालुक्यांमधील नागरिक ही खरेदीसाठी मोठ्या संख्येने संगमनेर शहरामध्ये येत असतात दररोज सुमारे दोन लाख नागरिकांची वर्दळ शहरांमध्ये असते.

गणेश उत्सवाच्या निमित्ताने संगमनेर शहरांमध्ये खरेदीसाठी व देखावे पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होणार आहे. पहिल्या दिवशी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी अनाधिकृतपणे सर्वत्र फ्लेक्स बाजी केल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. विविध ठिकाणी फ्लेक्स व कमानी लावण्यात आले आहे. यांची कोणतीही परवानगी नगरपालिकेकडून घेतलेली नाही. दादागिरी केली जात आहे. यामुळे गणेश भक्त व नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर संगमनेर बस स्थानक परिसरामध्ये महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी फ्लेक्स बाजीमुळे विद्रूपीकरण केले होते. यावर तालुक्यातून आणि शहरातून मोठा संताप निर्माण झाला होता.

यानंतर आ. सत्यजित तांबे यांनी फ्लेक्स बंदीबाबत आवाज उठवला. नगरपालिकेने अनधिकृत फ्लेक्सवर बंदी घातली. मात्र तरीही सत्तेचा वापर करून महायुतीचे पदाधिकारी कोणतीही परवानगी न घेता फ्लेक्स बाजी करत आहे. याउलट काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात ही महसूल मंत्री असताना त्यांनी स्वतः उभे राहून स्वतःचे फ्लेक्स काढले होते. शहरांमध्ये व्यापारी मोठ्या संख्येने असून या फ्लेक्समुळे वाहतूक कोंडीसह त्यांच्या व्यापारावर परिणाम होत आहे. त्यामुळे व्यापारी वर्गातही नाराजी आहे. महायुतीचे पदाधिकारी कोणतेही विकास कामे करत नाहीत फक्त फ्लेक्सबाजी करतात या फ्लेक्ससाठी पैसा येतो कुठून असा सवाल गणेश नगरमधील रहिवासी सागर गुंजाळ यांनी विचारला आहे.

### कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून फ्लेक्सबाजी

संगमनेरमध्ये यापूर्वी अशी फ्लेक्स बाजी कधी होत नव्हती. मात्र आता जेथे तेथे महायुतीचे फ्लेक्स लावले जातात. या फ्लेक्ससाठी पैसे कॉन्ट्रॅक्टर देतात. ही नेमकी काय भानगड आहे हे कळत नाही. कामे करा, फक्त फ्लेक्स लावून विद्रूपीकरण करण्याची गरज काय? असा संतप्त सवाल आरपीआयचे किसनराव माघाडे यांनी विचारला आहे.

# आदर्श विद्यालयात गणरायाचे स्वागत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : पानसवाडी येथील स्व. तुकाराम गडाख यांच्या हनुमान ग्रामीण संशोधन शिक्षण मंडळ संचालित आदर्श विद्यालयात गणेश चतुर्थीनिमित्त गणरायाची भक्तिमय वातावरणात स्थापना करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्ष जयश्रीताई गडाख व रविराज गडाख यांच्या हस्ते श्री गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. मिमांश व ईरा यांच्या उपस्थितीत ढोल-ताशांच्या गजरात आणि फुलांची उधळण करत विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्साहात गणरायाचे स्वागत केले. यावेळी हार, फुले, दुर्वा, खिरापत व पेढे अर्पण करून विधिवत पूजा व आरती करण्यात आली.

माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आकर्षक रांगोळी काढून हिंदू संस्कृती व परंपरेनुसार गणेश चतुर्थीचा उत्सव साजरा केला.

# ‘संगमनेर व्यापारी’ला नवी कार्यकारिणी

## गांडोळे अध्यक्ष, संत उपाध्यक्ष; खताळांकडून सन्मान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी व्यापारी शरद गांडोळे यांची, तर उपाध्यक्षपदी सुमेध संत, सचिवपदी कपिल टाक, सहसचिवपदी शेखर गाडे आणि खजिनदारपदी विशाल पडतानी यांची एकमताने निवड करण्यात आली.

संगमनेर व्यापारी असोसिएशनची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. या सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मावळते अध्यक्ष योगेश कासट होते. यावेळी संस्थेचे सचिव शरद गांडोळे, जुगलकिशोर बाहेती, सुमेध संत यांच्यासह व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

नूतन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल व्यापारी वर्गातून पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा आ. अमोल खताळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

> व्यापारी बांधवांच्या विविध अडचणी तसेच प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी असोसिएशनच्या माध्यमातून प्रभावीपणे काम केले जाईल. व्यापारी वर्गासमोरील प्रश्नांबाबत शासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल.
>
> **– शरद गांडोळे, नूतन अध्यक्ष**

# नारळ फोडण्यावरून शेतकऱ्याला मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : सामाईक शेतजमिनीवरील विहिरीजवळ असलेल्या म्हसोबा व मावळयाला नारळ फोडण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला, तुम्ही येथे नारळ फोडण्यासाठी यायचे नाही असे म्हणत पती-पत्नीने शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लाकडी दांड्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील वाघाचा आखाडा येथे घडली.

याप्रकरणी तुकाराम भिमराज तनपुरे (वय ५४, रा. वाघाचा आखाडा, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, वाघाचा आखाडा येथे तनपुरे यांची सामाईक वडिलोपार्जित शेती असून, या जमिनीतील विहिरीजवळ म्हसोबा व मावलया आहेत. सदर सामाईक जमिनीच्या हक्कावरून राहुरी न्यायालयात सन २०२३ पासून दावा सुरू आहे.

दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास तुकाराम तनपुरे हे पत्नीसमवेत सामाईक शेतातील म्हसोबा व मावळयाला नारळ फोडण्यासाठी गेले होते. त्यावेळी सावळेराम नळकांडे हे सामाईक शेतात पाणी धरत होते. त्यांनी तनपुरे यांना नारळ फोडण्यासाठी येथे येऊ नका, असे सांगितले. त्यावर तनपुरे यांनी ही वडिलोपार्जित शेती असल्याचे सांगितले.

याचा राग आल्याने सावळेराम भगिरनाथ नळकांडे व अनिता सावळेराम नळकांडे यांनी तनपुरे यांना शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लाकडी दांड्याने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. एवढ्यावरच न थांबता, पुन्हा या शेतात आला तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

# सोनईत वाजत-गाजत बाप्पाचे आगमन

## घरोघरी व गणेश मंडळांत बाप्पाची प्राणप्रतिष्ठा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात, ढोल-ताशांचा गजर आणि गुलालाची उधळण करत सोनई व परिसरात लाडक्या गणरायाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. घरोघरी तसेच विविध गणेश मंडळांमध्ये मुहूर्तावर गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

गणरायाच्या स्वागतासाठी तरुण मंडळांच्या वतीने आकर्षक विद्युत रोषणाईसह मंडप सजविण्यात आले आहेत. काही गणेश मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात वाजत-गाजत गणेशमूर्तीची मिरवणूक काढली. गुलालाची उधळण आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला होता. गणेशभक्तांसह नागरिकांचाही उत्साह द्विगुणित झाला.



लाडक्या बाप्पाला घरी आणण्यासाठी सकाळपासूनच भक्तांनी बाजारपेठेत गर्दी केली होती. गणेशमूर्ती, पूजेचे साहित्य, फुले तसेच बाप्पाचा आवडता मोदक खरेदी करण्यासाठी दुकाने व फुलबाजारात मोठी गर्दी झाली होती. गणेश मंडळांच्या मोठ्या मूर्तीही वाजत-गाजत मंडपाच्या दिशेने नेण्यात आल्या.

सोनई नदीपात्रातील मारुती मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी टाळांच्या गजरात आणि पाऊली खेळत गणरायाचे स्वागत केले. दिवसभर सोनई परिसरात गणेशभक्तांची मोठी वर्दळ दिसून आली.

### डिजेच्या आवाजाच्या मर्यादेवर लक्ष

जिल्ह्यात डिजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी डिजेच्या वापरावर तसेच गणेश मंडळांसमोरील साऊंडच्या आवाजाच्या मर्यादेवर लक्ष ठेवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# श्रीरामपुरात गणरायाचे उत्साहात स्वागत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरात गणेश चतुर्थीनिमित्त गणरायाचे उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. १४ सप्टेंबर रोजी सकाळपासूनच शहरातील विविध भागांत गणेशमूर्तींच्या आगमनाची लगबग सुरू होती. गणेशभक्तांनी पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करून लाडक्या बाप्पाची प्रतिष्ठापना केली.

गणपती बाप्पाच्या आगमनासाठी विविध गणेश मंडळांनी आकर्षक सजावट, फुलांची आरास आणि विद्युत रोषणाई केली होती. ढोल-ताशा, हलगी व पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाच्या मूर्ती मंडपात आणण्यात आल्या. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत असून, पुढील दिवसांत विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये ठाकरे गटाची नवी टीम

## तालुका कार्यकारिणीत फेरबदल; निष्ठावंत शिवसैनिकांना संधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने कर्जत तालुक्यात संघटनात्मक फेरबदल करत नवीन कार्यकारिणी जाहीर केली आहे. तालुकाप्रमुखपदी बळीराम मारुती यादव, तर कर्जत शहरप्रमुखपदी पांडुरंग हरीभाऊ जठार यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार या नियुक्त्या करण्यात आल्या. युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या सूचनेनुसार तसेच शिवसेना नेते खासदार संजय राऊत, जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, जिल्हाप्रमुख राजेंद्र





दळवी व रामदास गोल्हार यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्याची माहिती जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांनी दिली.

तालुका संघटकपदी दीपक माणिक गांगर्डे, विधानसभा समन्वयकपदी सुभाष नामदेव जाधव, तालुका प्रसिद्धीप्रमुखपदी दीपक सुरेश मांडगे, उपतालुका संघटकपदी महेंद्र शांतीलाल धोदाड, उपजिल्हा समन्वयकपदी लक्ष्मण सुधीर, विधानसभा संघटकपदी योगेश मांडगे आणि विधानसभा समन्वयकपदी भाऊसाहेब गुंड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय विविध गटांची कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली. मिरजगाव गटाच्या उपतालुका प्रमुखपदी सुभाष बळीराम सुद्रिक, विभागप्रमुखपदी पोपट विक्रम धनवडे, उपविभागप्रमुखपदी शाहू रमेश गांगर्डे व बाबासाहेब निवृत्ती जगताप, तर मिरजगाव शहरप्रमुखपदी बबन अशोक दळवी यांची निवड झाली.

चापडगाव गटाच्या तालुका उपप्रमुखपदी बापुराव बाबुराव नवसरे, विभागप्रमुखपदी अंगत जनार्धन शेंडकर, उपविभागप्रमुखपदी महेश पंडीत काळदाते व अमोल भारत धुमाळ, तसेच उपतालुका समन्वयकपदी अविनाश अंकुश मते यांची नियुक्ती झाली.

राशीन गटाच्या तालुका उपप्रमुखपदी अजित दत्तात्रय कानगुडे, विभागप्रमुखपदी संदीप राजेंद्र मोरे, उपविभागप्रमुखपदी विजय जयसिंग देशमुख व संदीप महादेव आगवण, राशीन शहरप्रमुखपदी जितेंद्र शिवदास शेटे आणि विभाग संघटकपदी संदीप रामचंद्र लोंढे यांची निवड करण्यात आली.

कुळधरण गटाच्या तालुका उपप्रमुखपदी सुजित घालमे, विभागप्रमुखपदी अमोल गोरख सुपेकर, तर उपविभागप्रमुखपदी नंदू तात्या पवार व बिभीषण झुंबर जंजिरे यांची नियुक्ती करण्यात आली. कोरेगाव गटाच्या तालुका उपप्रमुखपदी अक्षय शरद तोरडमल, विभागप्रमुखपदी अमोल बाळासाहेब क्षीरसागर, तर उपविभागप्रमुखपदी आप्पा बाबासाहेब शेगडे व संतोष संभाजी गायकवाड यांची निवड झाली.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे जिल्हा संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे व जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांनी अभिनंदन केले.

# गणेशखिंडीत भक्तिरसाचा जागर; कार्यक्रमांची रेलचेल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील श्रीक्षेत्र गणेशखिंड येथील वरद गजानन उत्सवाला काल (दि. १४) पासून भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. दि. २५ सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या उत्सवात विविध धार्मिक, आध्यात्मिक, कीर्तन, प्रवचन आयोजन करण्यात आले आहे.

श्रीक्षेत्र देवगडचे मठाधिपती महंत भास्करगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव होत आहे. उत्सव यशस्वीतेसाठी विश्वस्त व भजनी मंडळाने जय्यत तयारी केली आहे.

उत्सव काळात दररोज अखंड ज्योत प्रज्वलन, महापूजा, गणेशयात्रा, महाआरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संतचरित्र कथा, कीर्तन व हरिपाठ असे विविध कार्यक्रम होणार आहेत. दि. १४ ते २० सप्टेंबरदरम्यान श्रीमद् देवी भागवत महापुराण कथा, तर दि. २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज चरित्र कथेचे आयोजन करण्यात आले.

उत्सवात भरत महाराज जोगी, किसन महाराज पवार, संतोष महाराज चौधरी, अक्रुर महाराज साखरे, महादेव महाराज राऊत, ज्ञानेश्वर महाराज तांबे, ज्ञानेश्वर महाराज माऊली यांची कीर्तने होणार आहेत. दि. २२ सप्टेंबर रोजी निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचे कीर्तन होणार आहे. दि. २४ रोजी श्रीक्षेत्र सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांचे कीर्तन होणार आहे.

दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता श्रीक्षेत्र देवगडचे महंत स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा.

# पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## प्रभावती घोगरे यांचे तहसीलदारांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : पावसाने यंदा मोठी ओढ दिल्याने राहाता तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. पाणीटंचाईमुळे खरीप पिकांसह फळबागांवरही गंभीर परिणाम झाला असून, राहाता तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस प्रभावती जनार्दन घोगरे यांनी केली.

यासंदर्भात घोगरे यांनी राहाता तहसीलदारांना निवेदन दिले. तालुक्यात पावसाअभावी शेतीची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली असून, सोयाबीन, मका, बाजरी, कांदा, भाजीपाला यांसह डाळिंब व द्राक्षासारख्या





फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. आवश्यक पाणी उपलब्ध होत नसल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून, आगामी रब्बी हंगामही धोक्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील सद्यस्थितीची प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पिके व फळबागांचे पंचनामे करावेत. तसेच राहाता तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासाठी आवश्यक अहवाल शासनाकडे त्वरित पाठवावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविमा, नुकसानभरपाई आणि दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळवून द्यावा. तसेच पिण्याचे व शेतीचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसच्या वतीने देण्यात आला. यावेळी लोणी खुर्दचे सरपंच जनार्दन घोगरे, राहाता तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सचिन चौगुले, विविध विकास संस्था लोणी खुर्दचे चेअरमन भास्कर आहेर, राजेंद्र निर्मळ, महेश आहेर, राजेंद्र जेजुरकर यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात उच्च कायदे शिक्षणाची नवी वाट

## ‘नागवडे लॉ’मध्ये एलएलएम अभ्यासक्रमाचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च कायदे शिक्षणाची संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित श्री शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेजमध्ये एलएलएम अभ्यासक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याचवेळी एलएलबी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहात झाला. या नव्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासह न्यायिक सेवेकडे वाटचाल करण्याचा मार्ग अधिक सुकर होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र शिवाजीराव नागवडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य तसेच सर्वोच्च न्यायालयातील ॲडव्होकेट-ऑन-रेकॉर्ड ॲड. डॉ. राजेंद्र दत्तात्रय अनभुले उपस्थित होते.

SHRI SHIVAJIRAO NAGAWADE LAW COLLEGE
SHRIGONDA

विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त, कायद्याच्या मूलभूत संकल्पनांचा सखोल अभ्यास आणि व्यावसायिक नैतिकता जोपासल्यास कायदा क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध होतात, असे प्रतिपादन ॲड. डॉ. अनभुले यांनी केले. श्रीगोंद्यासारख्या तालुका ठिकाणी उच्च कायदे शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने केलेल्या प्रयत्नांचेकौतुक केले.

यावेळी न्यायिक सेवा तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र लवकरच सुरू करण्यात येईल, अशी घोषणा राजेंद्र नागवडे यांनी केली.

प्राचार्या डॉ. अंजुला एस. चौबे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात राजेंद्रदादा नागवडे यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधींचे सोने करत मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या बळावर स्वतःचे करिअर घडवावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमास श्रीगोंदा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. जयंत शिंदे, ॲड. अशोक रोडे, ॲड. सुनील बोस, ॲड. अशोक वाळुंज, ॲड. झराड, ॲड. संग्राम देशमुख, प्राचार्य अमोल नागवडे, प्रा. पी. जे. फाटे, डॉ. दिपाली जावळे, प्रा. रुपाली गोळे, ग्रंथपाल संदीप अवचिते, अर्पित रनसिंग, क्षितिज शितोळे, आदित्य दानवे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रुपाली गोळे यांनी केले, तर आभार ॲड. अशोक रोडे यांनी मानले.

# एका क्लिकवर गणरायाची प्रतिष्ठापना

## झूमने जोडली परंपरेची नाळ

**जनताआवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** एका क्लिकवर गणरायाची प्रतिष्ठापना, घरबसल्या शास्त्रोक्त पूजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संस्कृतीची परंपरा जपण्याचा अनोखा प्रयोग श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा येथे साकारला. वेदशास्त्री संपन्न ओंकारशास्त्री अशोक कुलकर्णी गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली झूम या ऑनलाइन माध्यमातून पार्थिव गणपती पूजन व गणेशमूर्ती स्थापना विधी पार पडला. राज्यातील विविध भागांतील भाविकांनी या उपक्रमात सहभागी होत आधुनिकता आणि परंपरेचा सुरेख संगम अनुभवला.

डिजिटल युगामुळे जीवनशैली झपाट्याने बदलत असताना धार्मिक परंपरा जतन करण्याचे आव्हानही वाढत आहे. नोकरी, व्यवसाय आणि धावपळीच्या जीवनामुळे अनेकांना प्रत्यक्ष उपस्थित राहून विधी करणे शक्य होत नाही. ही गरज ओळखून कुलकर्णी गुरुजी यांनी ऑनलाइन माध्यमाचा प्रभावी वापर करत भाविकांना घरबसल्या शास्त्रोक्त पूजन करण्याची सुविधा




उपलब्ध करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक भाविकाने आपल्या घरीच विधी पूर्ण केल्याने तंत्रज्ञान हे केवळ संवादाचे नव्हे, तर संस्कार जपण्याचेही प्रभावी माध्यम ठरू शकते, याची प्रचीती आली.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात गणेशोत्सवाला केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचे स्वरूप आहे. श्रद्धा, संस्कार, कुटुंबातील एकोप्याची भावना आणि परंपरांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला.

''तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ तुटता कामा नये. आधुनिक माध्यमांचा योग्य वापर करून धार्मिक परंपरा अधिक व्यापकपणे जपता येतात,'' असा संदेश ओंकारशास्त्री अशोक कुलकर्णी गुरुजी यांनी दिला. झूमच्या माध्यमातून झालेल्या या गणपती पार्थिव पूजन व स्थापना उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, गणेशोत्सवात परंपरा आणि तंत्रज्ञानाचा समन्वय साधणारा हा उपक्रम विशेष चर्चेचा विषय ठरला आहे.

# मुंढेकरवाडीच्या लेकीचे स्पर्धा परीक्षेत यश

## राजेंद्र नागवडे यांच्याकडून कौतुकाची थाप

**जनताआवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव :** शेतकरी कुटुंबातील संस्कार, आई-वडिलांचे कष्ट आणि स्वतः ची जिद्द यांच्या जोरावर मुंढेकरवाडी (ता. श्रीगोंदा) येथील ऋतुजा बापूराव कुरुमकर हिने यशाला गवसणी घातली आहे. स्पर्धा परीक्षा आणि एमपीएससीच्या माध्यमातून तिने ग्रामपंचायत अधिकारी पद मिळवत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.



ऋतुजाच्या या यशाबद्दल सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांच्या हस्ते कारखाना कार्यस्थळावर तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत नागवडे यांनी तिच्या मेहनतीचे कौतुक केले. ''आजच्या काळात मुली शिक्षण आणि गुणवत्तेच्या क्षेत्रात मोठी भरारी घेत आहेत. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून त्या विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. ऋतुजा कुरुमकर हिनेही जिद्द, चिकाटी आणि अभ्यासाच्या जोरावर शासकीय सेवेत स्थान मिळविले,'' असे राजेंद्र नागवडे म्हणाले. ऋतुजाची नियुक्ती अकोले तालुक्यातील कोहणे या दुर्गम भागात झाली असून, ती तेथील जबाबदारी सक्षमपणे पार पाडेल, असा विश्वास नागवडे यांनी व्यक्त केला. तसेच सेवेत कार्यरत असताना ज्ञानाची कास धरून भविष्यात आणखी मोठे ध्येय गाठावे, असे आवाहन त्यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना ऋतुजा कुरुमकर म्हणाली, ''स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अनेक आव्हाने आली; मात्र मनाशी जिद्द ठेवून सातत्याने अभ्यास केला. आई-वडिलांनी दिलेले पाठबळ आणि प्रोत्साहन यामुळे हे यश मिळवू शकले. नागवडे कारखान्याने केलेला सन्मान आणि दिलेले आशीर्वाद माझ्यासाठी प्रेरणादायी आहेत.''

यावेळी कारखान्याचे माजी उपाध्यक्ष व संचालक सुभाष शिंदे, संचालक विठ्ठलराव जंगले, ॲड. अशोकराव रोडे, आप्पासाहेब कुरुमकर, ऋतुजाचे वडील बापूराव कुरुमकर, सुनील जंगले, पत्रकार नंदकुमार कुरुमकर, दादा कुरुमकर, प्रकाश उंडे, नंदू मुंढेकर, पप्पू ठोमसकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन ह.भ.प. भाऊसाहेब बांदल यांनी केले.

# घोडनदी पुलावरील गोळीबार; खुनाच्या प्रयत्नातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**जनताआवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील घोडनदी पुलाजवळ गणेशमूर्ती घेऊन परतणाऱ्या तरुणावर गावठी कट्ट्यातून गोळी झाडून खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने एका आरोपीला अटक केली. ओम दीपक भोंडे (वय २१, रा. आण्णापूर, ता. शिरूर, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

बेलवंडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत संदीप वाबळे (वय २१, रा. म्हसे, ता. पारनेर) हे १४ सप्टेंबर रोजी मित्रासह शिरूरहून गणेशमूर्ती घेऊन गावाकडे परतत होते. गव्हाणवाडी-शिरूर मार्गावरील घोडनदी पुलाजवळ ते थांबले असताना आरोपींनी त्यांच्याकडे असलेली व्हेरना कार अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर किशोर शिंदे याने गावठी कट्ट्यातून फिर्यादीवर गोळी झाडून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी बेलवंडी पोलिस ठाण्यात बीएनएस कलम १०९(१), १८९(२), १९०, १९१(२) तसेच शस्त्र अधिनियमाच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष पथके तयार




करण्यात आली. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना आरोपी ओम भोंडे हा शिरूर येथील बाबुरावनगर परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली.

पथकाने तत्काळ शिरूर येथे जाऊन ओम भोंडे याला ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील तपासासाठी त्याला बेलवंडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, प्रकरणाचा पुढील तपास बेलवंडी पोलिस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे तसेच पोलीस अंमलदार सुनील पवार, रोहित येमुल, सागर ससाणे, विशाल तनपुरे, अमृत आढाव, फुरकान शेख आणि प्रशांत राठोड यांच्या पथकाने केली.

# दुष्काळाच्या झळा; श्रीगोंद्यात शेतकऱ्यांचा एल्गार

## तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी; आठ दिवसांत निर्णय न घेतल्यास रस्ता रोकोचा इशारा

**जनताआवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** पावसाअभावी शेती संकटात सापडली असून, पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर मांडवगण जिल्हा परिषद गटासह संपूर्ण श्रीगोंदा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत द्यावी, तसेच पाणी व चाऱ्याची व्यवस्था करावी, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला.




पंचायत समितीपासून तहसील कार्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. बैलगाडी आणि पोतराजाच्या पारंपरिक सादरीकरणातून दुष्काळाची दाहकता मांडत आंदोलकांनी शासनाचे लक्ष वेधले. घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविला. त्यानंतर तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी शेतकऱ्यांनी मांडवगण गटासह संपूर्ण तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली. माणसे व जनावरांसाठी तातडीने पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, चारा छावण्या सुरू कराव्यात, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, पीक कर्जवसुलीला स्थगिती द्यावी, विद्यार्थ्यांना फी सवलत द्यावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. तसेच जलसंधारणाच्या कामांना विशेष निधी, तलाव दुरुस्ती व खोलीकरण, पाणीगळती रोखण्यासाठी उपाययोजना, दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे व नुकसानभरपाई, तसेच शेतीसाठी नियमित वीजपुरवठा करण्याची मागणीही करण्यात आली.

मोर्चात संभाजी ब्रिगेड शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष दिलीप आबा वाळुंज, तालुकाध्यक्ष उत्तम मामा घोगरे, तालुकाध्यक्ष दिलीपराव लबडे, कार्याध्यक्ष बापू उर्फ प्रफुल्ल जगताप, सरपंच राम घोडके, सचिव रवींद्र महांडुळे, संघटक संतोष आरडे (मेजर), शहराध्यक्ष अक्षय दहातोंडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.

### 'आठ दिवसांत निर्णय घ्या; अन्यथा रस्ता रोको'

''प्रशासनाने आठ दिवसांत कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अन्यथा नगरसोलापूर महामार्गावरील मांडवगण येथे रस्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल. त्याची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील,'' असा इशारा संभाजी ब्रिगेडचे अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख इंजि. शामभाऊ जरे यांनी दिला.

# निर्भय महाराष्ट्र पार्टीची युवा टीम मैदानात

## प्रशांत लावरे तालुकाध्यक्ष, सागर सोनवणे युवा जिल्हाध्यक्ष

**जनताआवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** भ्रष्टाचार, अन्याय आणि अत्याचाराविरोधात लढणाऱ्या निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी टाकळीभान येथे नुकत्याच पार पडल्या. पार्टीचे संस्थापक जितेंद्र भावे आणि जिल्हाध्यक्ष शीतल गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी करण्यात आल्या.




यामध्ये प्रशांत लावरे यांची श्रीरामपूर तालुका अध्यक्षपदी, विजय बिरदवडे यांची टाकळीभान शहराध्यक्षपदी, किशोर आकोदे यांची श्रीरामपूर युवा अध्यक्षपदी, तर सागर सोनवणे यांची श्रीरामपूर युवा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. भ्रष्टाचार, अन्याय व अत्याचाराचे उच्चाटन करणे, जात-धर्माच्या पलीकडे जाऊन राजकारण करणे, तसेच शासकीय यंत्रणेकडून सर्वसामान्य जनतेची कोणत्याही प्रकारची लूट होऊ नये, यासाठी संघटना काम करणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. शासकीय कर्मचारी हे जनतेचे सेवक असून त्यांनी त्याच भावनेतून सेवा द्यावी, अशी संघटनेची भूमिका आहे.

खासगी सावकारांकडून सर्वसामान्यांवर होणारा अन्याय व अत्याचार तसेच शासकीय यंत्रणांमार्फत होणारी जनतेची लूट थांबविण्यासाठी निर्भय महाराष्ट्र पार्टी निर्भयपणे आवाज उठविणार आहे. अन्यायग्रस्त नागरिकांनी संघटनेशी संपर्क साधावा, असे आवाहन नूतन पदाधिकाऱ्यांनी केले. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल मित्रमंडळ व ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'वडिलांचा मृत्यू संशयास्पद खुनाचा गुन्हा दाखल करा' : गवारे

**जनताआवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** जमीन व मालमत्तेच्या वादातून आपल्या कुटुंबाला सातत्याने धमक्या, मारहाण आणि जीवघेण्या हल्ल्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करत पांडुरंग भास्कर गवारे यांनी वडिलांच्या मृत्यूची फेरचौकशी करण्याची मागणी केली आहे. वडिलांचा मृत्यू अपघाती नसून नियोजित खून असल्याचा दावा करत संबंधितांवर खुनाचा गुन्हा दाखल करावा, तसेच रोहित दिनकर यादव याच्यावर मोका अंतर्गत कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली.

गवारे यांनी सांगितले की, सावत्र भाऊ व इतर नातेवाईकांसोबत जमिनीच्या वादावरून न्यायालयीन लढा सुरू आहे. मालमत्तेचे वाटप होऊ नये यासाठी वडिलांना वारंवार धमक्या दिल्या जात होत्या. २७ मे २०२४ रोजी वडिलांनी पोलिसांकडे लेखी तक्रार देऊन काही व्यक्तींवर संशय व्यक्त केला होता, असे त्यांनी सांगितले. २९ जून २०२४ रोजी वडील दगडाच्या खाणीत गंभीर जखमी अवस्थेत आढळले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती, तर हातही मोडला होता. उपचारासाठी नेत असताना त्यांचा मृत्यू झाला. मात्र पोलिसांनी या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून केली असून, खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, असा आरोप गवारे यांनी केला.

दरम्यान, ३० एप्रिल २०२६ रोजी आपले अपहरण करून खंडाळा एमआयडीसी परिसरात नेण्यात आले. तेथे गावठी कट्ट्याचा धाक दाखवत लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. गळफास देण्याचा प्रयत्नही झाल्याचा आरोप त्यांनी केला. घराचा ताबा सोडण्यासाठी धमक्या देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात रोहित यादव व त्याच्या साथीदारांचा सहभाग असल्याचा आरोप करत, यादवचे 'बेग गँग'शी संबंध असल्याचा दावा गवारे यांनी केला. या दहशतीमुळे शेतीकामासाठी मजूर मिळत नसून कुटुंबाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलिस तपासात सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल सीडीआर, ओळख परेड, गुन्ह्यात वापरलेले वाहन व शस्त्र जप्तीसारख्या महत्त्वाच्या बाबींचा समावेश करण्यात आला नसल्याचा आरोप गवारे यांनी केला. तसेच तपासाशी संबंधित कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी दबाव आणला जात असल्याचेही त्यांनी म्हटले.

# ज्युदोमध्ये श्रीगोंद्याच्या कन्यांची सुवर्ण कामगिरी

## सिद्धी होळकर, कामिनी देवीकर यांची दक्षिण विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**जनताआवाज वृत्तसेवा**

**लिंपणगाव :** ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचाच प्रत्यय देत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या सिद्धी होळकर आणि कामिनी देवीकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतर विभागीय ज्युदो स्पर्धेत दिमाखदार यश मिळविले.



श्रीगोंदा येथे ११ सप्टेंबर रोजी झालेल्या या स्पर्धेत सिद्धी होळकर हिने ७८ किलोपेक्षा अधिक वजन गटात, तर कामिनी देवीकर हिने ६३ ते ७० किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे दोन्ही खेळाडूंची दक्षिण विभागीय आंतर विद्यापीठ ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ज्युदोसारख्या शारीरिक क्षमता आणि आत्मविश्वासाची कसोटी पाहणाऱ्या खेळात ग्रामीण भागातील मुलींनी मिळविलेले हे यश प्रेरणादायी ठरत आहे. मुलींनी क्रीडा क्षेत्रात पुढे जावे यासाठी पालकांनी दिलेले प्रोत्साहन आणि पाठबळ यामुळे सिद्धी व कामिनी यांनी हे यश मिळविले आहे. या यशाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच श्रीगोंदा परिसरातून दोन्ही खेळाडूंचे कौतुक होत आहे. महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, विकास समिती सदस्य राहुलदादा जगताप, महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. नितीन थोरात, प्रा. श्रीकांत थोरात, प्रा. रत्नाकर झिटे तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पाथर्डी, कोपरगाव आणि लोणीत गुटखा व्यावसायिकांवर छापे

## सात जणांविरुद्ध तीन गुन्हे

**जनताआवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात अवैध गुटखा, मावा आणि सुगंधी तंबाखूच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम राबवत पाथर्डी, कोपरगाव आणि लोणी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच दिवशी छापे टाकले. या कारवाईत सात जणांविरुद्ध तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून, ३४ हजार ९७६ रुपयांचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी गुप्त माहितीच्या आधारे १४ सप्टेंबर रोजी पाथर्डी, कोपरगाव आणि लोणी परिसरात एकाच वेळी कारवाई केली.

पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शैलेश नारायण भताणे (रा. देवराई, ता. पाथर्डी) याच्यासह अन्य दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, ३ हजार ३५४ रुपयांचा गुटखा व सुगंधी तंबाखू जप्त करण्यात आली. या प्रकरणातील किरण नरसाळे आणि इरफान शेख हे दोघे फरार आहेत.

कोपरगाव तालुक्यातील चांदे कसारे येथील विनायक वामनराव होन (वय ५२) याच्याविरुद्ध कारवाई करून १२ हजार २९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील जावेद शेख हा संशयित फरार आहे.

लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आबासाहेब सोपान बोरुडे (रा. कोल्हार, ता. राहाता) याच्याविरुद्ध कारवाई करत १९ हजार ३२८ रुपयांचा गुटखा व संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. या गुन्ह्यातील नवाब शेख हा संशयित फरार असून, त्याचा शोध सुरू आहे. या तिन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड तसेच त्यांच्या पथकाने केली.




# शिरसगावात पुन्हा बिबट्याचा धुमाकूळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव परिसरात गेल्या चार दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रवींद्र पवार यांच्या वस्तीवर दोन दिवसांपासून बिबट्या दिसत असून, शुक्रवारी त्यांच्या भावाचा कुत्रा बिबट्याने उचलून नेला. शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्याच वस्तीवर पुन्हा एका कुत्र्यावर बिबट्याने झडप घातली. मात्र, कुत्रा सुदैवाने बचावला.

शिरसगाव परिसरात बिबट्याचा वारंवार वावर आढळून येत असून, याबाबत वन विभागाला अनेकदा माहिती देऊनही अद्याप पिंजरा लावण्यात आलेला नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. परिसरातील उसाच्या शेतांमध्ये बिबट्याचा वावर असल्याने शेतकऱ्यांमध्ये अधिकच भीती निर्माण झाली आहे.

# आमदारांच्या अंगरक्षकावर वायरमनला मारहाण केल्याचा आरोप

**जनताआवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहर व तालुक्यातील वीजपुरवठ्याच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी आयोजित बैठकीत महावितरणच्या एका वायरमनला आमदार हेमंत ओगले यांच्या अंगरक्षकाने कानशिलात लगावल्याचा आरोप संबंधित कर्मचाऱ्याने केला आहे. या घटनेमुळे बैठकीत काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.



शहर व ग्रामीण भागातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाने वीज मिळणे तसेच इतर तांत्रिक अडचणींबाबत नागरिकांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी आमदार हेमंत ओगले यांनी नगर परिषदेत महावितरणचे अधिकारी-कर्मचारी, नागरिक आणि लोकप्रतिनिधींची बैठक आयोजित केली होती. बैठकीत अनेक नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत विविध प्रश्न उपस्थित केले. यावेळी हरेगाव येथील मतमाऊली यात्रेदरम्यान झालेल्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारावरही चर्चा झाली. या विषयावर संबंधित वायरमन म्हणून पंकज अशोक खरात हे स्पष्टीकरण देण्यासाठी पुढे आले असता, आमदारांच्या अंगरक्षकाने त्यांच्या कानशिलात लगावल्याचा आरोप खरात यांनी माध्यमांशी बोलताना केला. या बैठकीस नगराध्यक्ष करण ससाणे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, शहर व तालुक्यातील कार्यकर्ते, नगरसेवक तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर, बुधवार, दि.१६ सप्टेंबर २०२६, पान नं. ८


## गोठ्यातील जनावरे सोडल्याने मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव तालुक्यातील बक्तरपुर येथील रहिवासी असलेले आरोपी दिपक रामनाथ सानप व अनिता दिपक सानप यांनी आपल्या गोठ्यातील गायी का सोडल्या? याचा जाबसाल केला असता त्यांनी आपल्यासह आपले सासरे रामनाथ विठोबा सानप, नवरा भरत सानप आपली मुलगी अनन्या भरत सानप अशांना लोखंडी गज, विळा आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचा गुन्हा बक्तरपुर येथील महिला साधना भरत सानप (वय ३४) यांनी कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याने बक्तरपुर आणि परिसरात खळबळ उडाली आहे.

बक्तरपर येथील फिर्यादी महिला साधना सानप यांनी गुन्हा दाखल केला असून त्यात त्यांनी म्हटले आहे की, ''आपला आणि आमचे भावबंद यांचा एकत्र सामायिक गायींचा गोठा आहे. माझे कुटुंबात आपले पती भरत सानप, सासरे रामनाथ सानप, सासू इंदुबाई सानप, मुलगा कार्तिक, मुलगी अनन्या असे एकत्र राहत असून आपल्या शेजारी आपले चुलत सासरे दिपक रामनाथ सानप, त्यांची पत्नी अनिता दिपक सानप हे राहतात. त्यांनी आमची जनावरे सोडून दिल्याने त्यांना, ''आपण आमच्या गोठ्यातील जनावरे का सोडली ? असा प्रश्न विचारला असता त्यांनी आपल्याला आणि आपल्या कुटुंबातील सासरा, नवरा अशांना वाईट साईट शिवीगाळ करुन त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांच्या हातातील लोखंडी गज आणि विळ्याने मारहाण केली आहे व जीवे मारण्याची धमकी दिली आहे. यात आपले सासरे रामनाथ विठोबा सानप यांना जास्त मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले आहे.

# इथेनॉल दर ऊस एफआरपी बरोबर संलग्न करा

## माजी मंत्री गडाख; मुळाची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : केंद्र शासनाने साखरेच्या विक्रीची किमान आधारभूत किंमत ३१ रुपये किलो निश्चित केली. त्याला ८ वर्ष झालीत. त्यात दरवर्षी ऊसाची एफ.आर.पी. वाढवली, मात्र साखरेच्या किमान किंमतीत कोणतीही वाढ झाली नाही. त्यामुळे उत्पादन व विक्रीच्या किंमतीत जवळपास १० ते १२ रुपये किलोचा फरक पडतो. त्यामुळे साखर कारखानदारीचे गणित बिघडले असून २० ते २५ कारखाने कायमस्वरूपी अडचणीत येण्याची शक्यता असल्याचे सांगून सरकारने कारखानदारीला उर्जीत अवस्था येण्यासाठी साखर, वीज आणि इथेनॉलचे दर ऊसाच्या एफ.आर.पी. बरोबर संलग्न करावेत, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री शंकरराव गडाख यांनी केली.




कारखान्याचे चेअरमन भाऊसाहेब मोटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुळा कारखान्याच्या वार्षिक सभेत ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, ऑगस्ट महिन्यात झालेली दरवाढ अल्पजीवी असल्याचे सांगून त्याचा फायदा कारखाना व शेतकऱ्यांना झाला नसल्याचे ते म्हणाले. साखरेच्या निर्यातबंदीवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. केंद्र सरकारने साखरेच्या विक्रीबाबत दुहेरी दराचे धोरण घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे ते म्हणाले. राज्यातील १ लाख कोटीची उलाढाल असलेल्या या उद्योगाकडून दरवर्षी सरकारला ९ हजार कोटी मिळतात. म्हणून साखर उद्योगाच्या प्रश्नावर सरकारने सकारात्मक भुमिका घ्यावी, अशी मागणी गडाख यांनी केली.

इथेनॉल प्रकल्पाबाबत बोलताना ते म्हणाले की, साखरेची झालेली भाव वाढ रोखण्यासाठी इथेनॉल उत्पादनांवर काही निर्बंध येण्याची शक्यता असल्याने पुढील वर्षी इथेनॉल प्रकल्पांच्या बाबतीत मोठी अनिश्चितता दिसत आहे. म्हणून इथेनॉलच्या बाबतीत होणारी धरसोड कमी करुन त्यात निर्माण झालेली संधिग्धता केंद्र सरकारने दूर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

कारखान्याचे सभासद कारभारी जावळे, बाळासाहेब बनकर, कैलास जाधव, कर्णासाहेब औटी, अरुण सावंत, भास्करराव भुसारी, एकनाथ रौंदळ, आप्पासाहेब निमसे, राजेंद्र टेमक, बाबासाहेब आढाव, आदिनाथ रौंदळ, रामभाऊ कराळे, राजेंद्र सानप, सोमनाथ बंग, शरद जाधव, दादासाहेब जाधव, यांनी चर्चेत भाग घेतला. सर्व विषयांना मंजूरी देण्यात आली. सभेचे अध्यक्ष भाऊसाहेब मोटे यांनी समारोप करुन उपस्थितांचे आभार मानले.

### ९ लाख ३० हजार टनाचे गाळप

अहवाल सालातील हंगामात प्रतिकुल परिस्थीती असतानाही ९ लाख ३० हजार टनाचे गाळप केल्याचे सांगून दैनंदिन गळीताचा १० हजार टनाचा विक्रम मोडून २५ फेब्रुवारीपर्यंतच संपुर्ण ऊसाचे गाळप केले. ७ लाख ६१ हजार क्विंटल साखरउत्पादन केले. १०.६७% साखर उतारा मिळाला. १११ कोटीचे इथेनॉल व २७ कोटीची वीज निर्मिती झाली. येणाऱ्या हंगामावर दुष्काळाचे सावट आहे. पण जमेची बाजू म्हणजे मुळा, निळवंडे आणि जायकवाडी बॅक वॉटरमध्ये समाधानकारक पाणीसाठे झाले आहेत. सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी पाण्याचा लाभ घ्यावा आणि एकरी उत्पादन वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले.

## नम्रताच माणसाला मोठे बनवते: मिरीकर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोपरगाव** : जन्माला येताना माणूस सोबत काहीच घेऊन येत नाही. ज्ञान, संपत्ती, सत्ता आणि प्रतिष्ठा ही सर्व ईश्वराची देणगी आहे. म्हणून माणसाने अहंकार न करता नम्रतेने जगले पाहिजे. नम्रताच माणसाला मोठे बनवते असे उद्गार ज्येष्ठ किर्तनकार ह. भ. प. मीराबाई मिरीकर यांनी संवत्सर येथे आयोजित किर्तनाद्वारे व्यक्त केले.

कोपरगांव तालुक्यातील संवत्सर येथे ऋषीपंचमीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या किर्तनातून ह. भ. प. मीराबाई मिरीकर भावीक श्रोत्यांना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. गोदावरी नदीमध्ये ऋषीपंचमीनिमित्त लाखो महिला भाविकांनी स्नानांची पर्वणी साधली. त्यानंतर श्री शनी महाराज मंदिराच्या प्रांगणात मीराबाई मिरीकर यांचे किर्तन पार पडले. नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य ह. भ. प. देविदास महाराज म्हस्के, आमदार आशुतोष काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व गोदावरी खोरे दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे यांनी ग्रामस्थांच्यावतीने मीराबाई व म्हस्के महाराज यांचा सत्कार करुन उपस्थितांचे स्वागत केले. मीराबाई पुढे म्हणाल्या, भक्ती म्हणजे केवळ पूजा-अर्चा नव्हे तर प्रत्येक कर्म प्रामाणिकपणे आणि ईश्वराला साक्षी मानून करणे होय. भक्तीने मन शुद्ध होते आणि सत्कर्मानी जीवन सुंदर होते. माणसांचे कर्म शुद्ध असेल, तर जीवनात समाधान नक्कीच येते. ज्याच्याकडे समाधान आहे, तो खरा श्रीमंत आहे. प्रेम, श्रद्धा आणि समर्पणाने केलेली भक्ती मनाला शांती व जीवनाला दिशा देते. म्हणून प्रत्येक क्षण सत्कर्म, नामस्मरण आणि परोपकारासाठी उपयोगात आणावा, असेही मीराबाई यांनी सांगितले.

## महंत सुनीलगिरी महाराजांचे अनुष्ठान सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कौठा** : नेवासा तालुक्यातील मुकिंदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख गुरुवर्य महंत सुनीलगिरीजी महाराज यांचे बारा दिवशीय मौन व्रत व अनुष्ठान शुभारंभ गणरायाच्या आगमनापासून करण्यात आला. अनंत चतुर्दशी पर्यंत हे मौन व्रत अनुष्ठान चालणार आहे. धर्माचे वैभव वाढावे यासाठी माझे हे मौन व्रत अनुष्ठान मागचा मुळ उद्देश असल्याचे प्रतिपादन महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी या प्रसंगी बोलतांना केले.

प्रभु रामचंद्र, प. पू. ब्रम्हलिन योगिराज प्रल्हादगिरीजी महाराज, ब्रम्हलिन सद्गुरु स्वामी प्रकाशगिरीजी महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने व देवगडचे महंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या



२६ वर्षांपासून गणेशोत्सवानिमित्त गुरुवर्य महंत सुनिलगिरीजी महाराज यांचे मौन व्रत व अनुष्ठान हे या कालावधीत सुरू आहे. अनुष्ठान व मौन व्रत शुभारंभ प्रसंगी महंत सुनीलगिरी महाराज यांनी श्रीराम साधना आश्रमातील प्रभू रामचंद्र भगवंताचे व येथेच स्थापित झालेल्या बारा जोतिर्लिंगाचे दर्शन घेतले. साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य म्हणाल्या की, महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांनी सुरू केलेले धर्म कार्य हे धर्म जागृतीसाठी असून भाविकांमध्ये त्यामुळे आध्यात्मिकता वाढीस लागली आहे. धर्म जनजागृतीसाठी त्यांचे कार्य मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

महंत सुनीलगिरी महाराजांचे मौन व्रत व अनुष्ठान हे दि.१४ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर या कालावधीत सुरु रहाणार आहे. या प्रसंगी संतसेवक वैभव निकम, पोपट महाराज निपुंगे, सीताराम निपुंगे, आप्पा बनकर, लक्ष्मण निपुंगे, शुभम सुरोशे, प्रशांत पवार, आबासाहेब गायकवाड, विठ्ठल धनाळे, अशोक पवार यांसह श्रीराम सेवा मंडळ मुकिंदपूर - नेवासा फाटा येथील सेवेकरी, ग्रामस्थ, श्रीराम साधना आश्रमातील भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहागडाच्या विकासासाठी पुढे यावे

### नीलम खताळ; शहागडावर हिंदवी स्वराज्य संकल्प दिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पेमगिरीच्या शहागडाला मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. हा इतिहास केवळ पेमगिरी किंवा संगमनेर तालुक्यापुरता मर्यादित न ठेवता तो महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्या मध्ये पोहोचविण्याची गरज आहे. शहागडाच्या विकासाचा ध्यास आ. अमोल खताळ यांनी घेतला असून त्यासाठी पेमगिरीकरांनी आपल्या गावातील राजकारण, गट-तट बाजूला ठेवून एकजुटीने पुढे येण्याची गरज आहे, असे आवाहन आदिशक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा नीलम खताळ यांनी केले.



संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागडावर हिंदवी स्वराज्य संकल्प दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर यावेळी कोल्हापूर येथील शिवचरित्रकार डॉ. संदीप महिंद, किल्लेदार, फिरंगोजी नरसाळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके, चंदनपुरीचे माजी सरपंच प्रमोद राहणे, श्रीक्षेत्र वढू येथील अंजली देशमुख, वर्षा डुबे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. खताळ म्हणाल्या, शहागडाच्या विकासासाठी आ. खताळ कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाहीत. मात्र, या विकासकामांना गती देण्यासाठी पेमगिरीकरांनी एकजुटीची ताकद दाखविणे गरजेचे आहे. शहागडावर तीन दिवसांचा हिंदवी स्वराज्य संकल्प दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन विभागाची परवानगी मिळाली आहे.

“शहाजीराजे भोसले यांनी वेरूळ येथून सुमारे २०० ते २५० किलो मीटरचा प्रवास करून पेमगिरीच्या शहागडावर येत स्वराज्याचा संकल्प केला होता. हा इतिहास केवळ पेमगिरी किंवा संगमनेर तालुक्या पुरता मर्यादित न ठेवता तो सर्वांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. पेमगिरी येथील शहागडाचा इतिहास महाराष्ट्र भर पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. पुढील वर्षी शहाजीराजांची केवळ प्रतिमा न ठेवता त्यांची मूर्ती तयार करून पालखीतून शहागडावर आणावी.

**- डॉ. संदीप महिंद,**
ज्येष्ठ व्याख्याते, कोल्हापूर

## लोकअदालतीत ५६ लाख ८० हजारांची तडजोड

### ४३०१ दाखलपूर्व व ७० प्रलंबित प्रकरणे निकाली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी न्यायालयात दाखलपूर्व तसेच न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतीत तब्बल ५६ लाख ८० हजार ७४ रुपयांची तडजोड झाली.लोक अदालतीच्या माध्यमातून नागरिकांना वेळ व पैशांची बचत करून आपसातील वाद सलोख्याने मिटविता येत असल्याने या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.




पाथर्डी न्यायालयात आयोजित लोकअदालतीचे उद्घाटन सह दिवाणी न्यायाधीश विशाल धोंगडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश रविकिरण सपाटे, पाथर्डी तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राणा खेडकर, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. चंद्रकांत सातपुते, ॲड. आसाराम पठाडे यांच्यासह वकील संघाचे उपाध्यक्ष, सचिव तसेच सर्व विधिज्ञ उपस्थित होते. लोकअदालतीमध्ये दाखलपूर्व ४३०१ प्रकरणे तसेच न्यायालयातील ७० प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. विविध प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकारांनी आपसातील मतभेद व वाद सामंजस्याने मिटविल्याने मोठ्या प्रमाणात वेळ आणि खर्चाची बचत झाली. एकूण ५६ लाख ८० हजार ७४ रुपयांची तडजोड झाल्याने लोकअदालतीच्या माध्यमातून वाद मिटविण्याला मिळालेल्या प्रतिसादाचे चित्र स्पष्ट झाले. लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी पाथर्डी तालुका वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांसह सर्व विधिज्ञांनी सहकार्य केले. आभार ॲड. राणा खेडकर यांनी मानले.

### वाद टाळण्यास मदत

न्यायाधीश धोंगडे म्हणाले की, लोकअदालतीच्या माध्यमातून आपसातील वाद सामंजस्याने मिटविल्यास नागरिकांचा वेळ व पैसा वाचतो. न्यायालयीन प्रक्रियेला लागणारा प्रदीर्घ कालावधी टाळून दोन्ही पक्षांच्या संमतीने वादावर तोडगा काढता येतो. विशेष म्हणजे, आपसातील वाद लोकअदालतीत मिटविल्याने पक्षकारांमध्ये सलोख्याची भावना निर्माण होते आणि भविष्यातील वाद टाळण्यास मदत होते. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी लोकअदालतीच्या माध्यमातून आपले वाद कायमस्वरूपी संपुष्टात आणावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## नगरपंचायतीत दलितवस्ती निधीत गैरव्यवहार?

### नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला चपलांचा हार!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : दलित वस्ती निधीच्या कथित काळाबाजार आणि उघड गैरव्यवहाराविरोधात कर्जत नगरपंचायतीमध्ये संतापाचा तीव्र उद्रेक पाहायला मिळाला. प्रशासनाला जाग आणण्यासाठी आठ दिवसांपूर्वीच निवेदन देण्यात आले होते; मात्र तरीही प्रशासन आणि जबाबदार पदाधिकारी गैरहजर राहिल्याने संतप्त आंदोलकांनी थेट नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला चपलांचा हार घालून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला.



शासकीय नियमांनुसार दलित वस्तीचा निधी राखीव प्रभाग सोडून इतरत्र खर्च करायचा असल्यास, ५० टक्क्यांपेक्षा जास्त मागासवर्गीय लोकसंख्या असलेल्या प्रभागांमध्ये उतरत्या क्रमाने निधी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र, कर्जत नगरपंचायतीने सामाजिक न्याय विभागाच्या या शासन निर्णयाला पूर्णपणे हरताळ फाळत निधीचे बेकायदेशीर वाटप केल्याचा गंभीर आरोप आंदोलकांनी केला आहे. तांत्रिक मंजुरी मिळवण्यासाठी कागदपत्रांची खोटी पूर्तता करणाऱ्या अधिकारी, पदाधिकारी आणि संबंधित संस्थांच्या व्यक्तींवर तातडीने अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी आक्रमक मागणी या वेळी करण्यात आली.

या आंदोलनात भास्कर भैलुमे, रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता कदम, शिवसेना युवा नेते सचिन घुले, उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे, नगरसेवक भाऊसाहेब तोरडमल, सचिन कुलथे, ओंकार तोटे, रिपाई युवक जिल्हाउपाध्यक्ष विशाल काकडे, शहराध्यक्ष सोहन कदम, अनुराग भैलुमे उपस्थित होते. ''प्रशासनाने सर्व नियमांची पायमल्ली करून दलित वस्तीच्या निधीचा उघड गैरवापर केला आहे. आज केवळ पोलिसांच्या विनंतीवरून आंदोलन स्थगित केले आहे. जर यावर तात्काळ योग्य ती कारवाई झाली नाही, तर पुढील आठवड्यात नगरपंचायतीला तीव्र स्वरूपाचे टाळे ठोक आंदोलन छेडले जाईल.''असा इशारा भास्कर भैलुमे यांनी दिला आहे.

## पाथर्डीत भरदुपारी ट्रकचालकास मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : गणेश स्थापना दिनी सोमवारी (दि. १४) भरदुपारी पाथर्डी शहरातील विजय हनुमान मंदिर परिसरातील पोळा मारुतीजवळ तीन ते चार युवकांनी ट्रकचालक व क्लिनरला लाकडी दांड्याने व दगडाने बेदम मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली.

या हल्ल्यात ट्रकच्या काचाही फोडण्यात आल्या. सुमारे अर्धा तास सुरू असलेल्या या मारहाणीमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.ट्रकचालक आप्पा फारुण शेख (रा. घोडेगाव, ता. नेवासा) व त्यांचा सहकारी क्लिनर हे खरवंडीच्या दिशेने पाथर्डीकडे येत असताना पोळा मारुतीजवळ हा प्रकार घडला. अचानक तीन ते चार युवकांनी ट्रक अडवून दोघांवर हल्ला चढविला. लाकडी दांडे व दगडांचा वापर करून त्यांना मारहाण करण्यात आली. यामध्ये शेख हे गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले, तर ट्रकचा क्लिनर (नाव माहिती नाही ) यालाही दुखापत झाली.

भरदुपारी रस्त्यावर सुरू असलेला हा प्रकार ये-जा करणारे नागरिक व वाहनधारक पाहत होते. एका दांपत्याने हल्लेखोर युवकांना आवरण्याचा प्रयत्न केला; मात्र युवकांनी कोणाचेही न ऐकता मारहाण सुरूच ठेवली. अखेर काही सुज्ञ नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधल्यानंतर पाथर्डी पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस येत असल्याचे समजताच हल्लेखोर तेथून पसार झाले. जखमींना उपचारासाठी पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. आप्पा शेख यांची प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे. या घटनेत दोन जण जखमी झाले असून ट्रकच्या काचा फोडण्यात आल्या आहेत. हा सर्व प्रकार अनेक नागरिकांच्या मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे.

# देशाच्या जडणघडणीत अभियंत्यांचा मोठा वाटा

## महापौर गाडे; महापालिका अभियंत्यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या अभियंता दिनाचे औचित्य साधून उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वतीने अहिल्यानगर महापालिकेतील अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. महापौर ज्योतीताई गाडे व महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते अभियंत्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक मनोज दुल्लम, महेश लोंढे, पुष्कर कुलकर्णी, रोहन सानप यांच्यासह सत्कारमूर्ती अभियंते मनोज पारखे, सुरेश इथापे, श्रीकांत निंबाळकर, वैभव जोशी, अश्विनी जाधव, जितेंद्र शेळके, खलील पठाण, आदित्य बल्लाळ, गणेश गाडळकर, अंजली गदादे, भक्ती बेल्हेकर, निकिता गोरे, राजेंद्र मेहत्रे, सुजित कोके, रामदास साळी, निलेश पेटेकर, शुभम पवार, सर्वार्थ मुदगल, राहुल गीते, प्रदीप ढगे, अनिकेत केकाण आदी अभियंते उपस्थित होते.



महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त देशभरात अभियंता दिन साजरा केला जातो. जलव्यवस्थापन, सिंचन, धरणे आणि औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात सर विश्वेश्वरय्या यांनी केलेले कार्य आजही सर्वांसाठी ऊर्जा व प्रेरणादायी आहे. देशाच्या जडणघडणीमध्ये अभियंत्यांचा मोठा वाटा असून शहर विकासामध्येही अभियंत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

महापालिकेमध्ये अभियंत्यांची संख्या कमी असली, तरी उपलब्ध अभियंते रस्ते, पूल, पाणीपुरवठा, जलनिस्सारण व्यवस्थापन, पथदिवे, उद्याने, सार्वजनिक इमारती तसेच विविध नागरी सुविधांच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहेत. अभियंता दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने सर्व अभियंत्यांना शुभेच्छा देत असल्याचे महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, महापालिकेमध्ये अभियंत्यांची संख्या कमी असू नये. अभियंते शहर विकासाची विविध कामे करीत असून रात्रंदिवस जनतेच्या सेवेसाठी कार्यरत असतात. अशा अभियंत्यांचा अभियंता दिनानिमित्त सत्कार करून गौरव करण्यात आला. यावेळी माजी शहर अभियंता सुरेश इथापे यांनी अभियंता दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.

### विश्वेश्वरय्यांचा आदर्श अंगीकारावा

महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकाऱ्यांनी दूरदृष्टी आणि नियोजनबद्ध पद्धतीने अभेद्य किल्ल्यांची निर्मिती केली. आजही या वास्तू आपल्याला पाहायला मिळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा तसेच भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या कार्याचा आदर्श अभियंत्यांनी अंगीकारावा.


हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.